बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

दैनिक बीड
# पुण्यभूमी
संपादक:बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | मंगळवार,दि.२२ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक८०वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३

# महायुतीच्याच नेत्यांविरोधात फिल्डिंग

**महादेव जानकर यांचा मोठा प्लान काय?**

**दोन्हीही मोठे पक्ष छोट्या पक्षांना खात आहेत**

**शिंदे, फडणवीस, अजितदादांना मतदारसंघातच घेरणार**





बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाचे सर्वेसर्वा महादेव जानकर यांनी महायुतीला सोडचिठ्ठी दिली आहे. महादेव जानकर आता स्वबळावर राज्यातील सर्व मतदारसंघांमध्ये आपले उमेदवार उतरवणार आहेत. तसेच जानकर प्रत्येक मतदारसंघात सभा घेणार आहेत. विशेष म्हणजे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मतदारसंघात सभा घेण्याचा प्लॅनच जानकरांनी आखून ठेवला आहे. महादेव जानकर यांनी आज दौंडमध्ये माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी आपली आगामी काळासाठी काय रणनीती ठरली आहे, याबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यांच्या माहितीनुसार जानकरांनी विधानसभा निवडणुकीसाठी मोठा प्लान आखून ठेवल्याचं सध्याचं चित्र दिसत आहे.

राष्ट्रीय समाज पक्षाचे राज्यात मेळावे सुरू आहेत. अनेक मतदारसंघाचे मिळून मेळावे घेतले जात आहेत. आज दौंडच्या उमेदवाराचे नाव जाहीर होणार नाही. फक्त मेळावा होणार आहे. दौंडसाठी सक्षम उमेदवार आल्यानंतर नाव निश्चित केले जाईल. आज लोकांचे मत जाणून घेण्यात येईल. पार्लमेंटरी बोर्डाकडे ती यादी पाठवून नाव निश्चित केले जाईल. दौंडसाठी दोन–तीन जणांची नाव आले आहेत. पण पार्लमेंटरी बोर्डाकडे अंतिम निर्णय आहे, अशी प्रतिक्रिया महादेव जानकर यांनी दिली.भाजप आणि काँग्रेस आम्हाला समान अंतरावर आहेत. दोन्हीही मोठे पक्ष छोट्या पक्षांना खात आहेत. मी आमदार करणारा माणूस आहे. त्यांच्याकडे मी भीक मागत बसू का? असा सवाल महादेव जानकर यांनी केला. उद्याचे राज्य सरकार बनेल. पण मला विचारल्याशिवाय मुख्यमंत्री बनणार नाही, असा मोठा दावा महादेव जानकर यांनी केला.

## महादेव जानकर संतापात म्हणाले

मी देणारा आहे. घेणारा नाही. मला विधान परिषद देत होते. पण मी घेतली नाही. आम्हाला महायुतीतील पक्षांनी विश्वासात घेतलं नाही. आम्हाला कसल्याही जागांची चर्चा किंवा बैठकीला बोलवलं नाही. त्यामुळे आम्ही महायुतीतून बाहेर पडलो. आता महायुतीत बोलावलं तरी परत जाणार नाही. महाविकास आघाडी आणि महायुतीत देखील आता जाणार नाही. आता आमचं काय होईल यासाठी आम्ही खंबीर आहोत, असं जानकर म्हणाले. भाजप म्हणेल आमचा विजय होतोय, महायुती म्हणेल आमचा विजय होतोय आणि महाविकास आघाडी म्हणेल आमचा विजय होतोय. मला त्यांच्याबद्दल अजिबात विचारू नका. त्यांच्याबद्दल बोलण्याचा मी मक्ता घेतला नाही, असं महादेव जानकर संतापात म्हणाले.

## राज्यात स्वबळावर जागा लढविणार!

### जानकरांचा महायुतीला मोठा इशारा

अजित पवारांची बारामती, देवेंद्र फडणवीस यांचे नागपूर, चंद्रशेखर बावनकुळे यांचे कामठी या ठिकाणी सभा घेणार आहोत. पृथ्वीराज चव्हाण यांच्या कराड येथे देखील आणि राज्यातील सर्व ठिकाणी सभा घेणार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या कोपरी या ठिकाणी देखील सभा घेणार आहोत. मी या निवडणुकीत कोणालाही सोडणार नाही, असा इशारा महादेव जानकर यांनी दिला.



## जागावाटपाचा तिढा सुटला?

**राजकीय:रमेश चेन्निथलांनी दिली महत्त्वाची माहिती**

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक जाहीर झाली आहे, महाराष्ट्रात आचारसंहिताही लागू झाली आहे. निवडणूक पार पडण्यासाठी जेमतेम २९ दिवस राहिले आहेत. तरीही महाविकास आघाडीचा जागा वाटपाचा तिढा सुटलेला नाही. काही जागांवर शिवसेना (उद्धव ठाकरे) आणि काँग्रेस या दोन पक्षांमध्ये पेच निर्माण झाला आहे. संजय राऊत यांनीही काँग्रेसला सुनावत त्यांनी जर मुंबईत निर्णय घेतला तर जागावाटप लवकर होईल असं म्हटलं होतं. तसंच महाराष्ट्रातल्या काँग्रेस नेत्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नाही असंही म्हटलं होतं. यानंतर काँग्रेस एक बैठक पार पडली आहे. या बैठकीनंतर रमेश चेन्निथला पान २ वर...

### बाळासाहेब थोरात यांनी काय म्हटलं आहे?

आम्ही साधारण ९६ जागांवर चर्चा केली. तसंच लवकरच अंतिम निर्णयापर्यंत आम्ही येऊ. त्याचप्रमाणे मतदार याद्यांमध्ये फेरफार करण्याचा जो मुद्दा आहे तो गंभीर आहे त्याबाबत आम्ही निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. निवडणूक आयोग काय कारवाई करणार ते पाहू असं बाळासाहेब थोरात म्हणाले आहेत.शिवसेना (उद्धव ठाकरे), काँग्रेस, आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) या तिन्ही पक्षांमध्ये काही जागांवरुन पेच आहे. आज सकाळी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिलेल्या माहितीनुसार ७ ते ८ जागांवरचाच तिढा उरला आहे. २२ ऑक्टोबरच्या (मंगळवार) बैठकीत यावर अंतिम निर्णय होईल अशी चिन्हं आहेत.

## महाराष्ट्रात फक्त गुलाबी वादळ

**अजित पवार :२७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर**



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री अजित पवार ( –क्षळीं झुरुी ) यांनी महाराष्ट्रात फक्त गुलाबी वादळ घोंघावणार आणि राष्ट्रवादीच्या घड्याळाचे काटे जोमाने फिरणार अशी पोस्ट करत २७ स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी जेमतेम २९ दिवस उरले आहेत. महायुतीमधल्या भाजपाने ९९ जागा जाहीर केल्या आहेत. तर अजित पवार ( –क्षळीं झुरुी ) यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. अशी या स्टार प्रचारकांची नावं आहेत. अजित पवार ( –क्षळीं झुरुी ) यांनी गुलाबी जॅकेट आणि गुलाबी गाड्या अशी प्रचाराची थीम घेतली आहे. साधारण मागच्या काही महिन्यांपासून त्यांचे राज्यभरात दौरे सुरु आहेत. लाडकी बहीण योजना कधीही बंद केली जाणार नाही असंही अजित पवार यांनी जाहीर केलं पान २ वर...

### महाराष्ट्रातली निवडणूक २० नोव्हेंबरला

महाराष्ट्रातली विधानसभा निवडणूक २० नोव्हेंबरला होणार आहे. एकाच टप्प्यात ही निवडणूक पार पडणार आहे. तसंच २३ नोव्हेंबरला निवडणुकीचा निकाल लागणार आहे. महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा थेट सामना या निवडणुकीत होणार आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगलं यश मिळालं. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावला आहे. तर दुसरीकडे हरियाणा या ठिकाणी मिळालेल्या विजयामुळे भाजपानेही महाराष्ट्रात याच विजयाची पुनरावृत्ती होईल असं म्हटलं आहे. आता काय होणार ते २३ नोव्हेंबरला स्पष्ट होणार आहेच. मात्र अजित पवारांनी खास पोस्ट करत स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे.

## राज ठाकरेंकडून पहिली यादी जाहीर

**पडघम:राजू पाटील यांच्यासह ‘या’ नावाची घोषणा!**



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली जात आहे. भाजपाने काल (२० ऑक्टोबर) उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. त्यानंतर एकापाठोपाठ एक अनेक संभाव्य याद्या समोर येऊ लागल्या. महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात कडवी लढत होत असताना आता राज ठाकरेंनीही मैदानात उडी घेतली आहे. त्यांनीही आज दोन उमेदवारांची नावे जाहीर केली. ते डोंबिवली बोलत होते.

उमेदवारांच्या यादीवर शेवटचा हात फिरवला जातो आहे. आज किंवा उद्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर होईल. पण त्यापूर्वी कल्याण ग्रामीणमधून मी राजू पाटील आणि ठाण्यातून अविनाश जाधव यांची उमेदवारी जाहीर करतो आहे. येत्या २४ तारखेला पान २ वर...

## भाजपाचा निसटता पराभव म्हणून

**चर्चेतले:राजेंद्र मस्केंनी घेतली मनोज जरांगे पाटलांची भेट**



बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

शेतकरी मित्र राजेंद्र मस्के यांनी भारतीय जनता पार्टी जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिल्यानंतर आज प्रथमच संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांची अंतर्वली सराटी येथे भेट घेतली.लोकसभा निवडणुकीत जिल्हाध्यक्ष पदाची धुरा संभाळत सामाजिक प्रतीकुल परिस्थितीत प्रचार यंत्रणा उभी केली.

भाजपाचा निसटता पराभव झाल्या नंतर पराभवाचे खापर मराठा समाजावर फोडून राजेंद्र मस्के यांच्या कामावर संशय व्यक्त केला.अखेर काल राजेंद्र मस्के यांनी समर्थक व कार्यकर्त्यांची बैठक घेऊन भारतीय जनता पार्टीचा त्याग करून जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. २०१९ पासून बीड विधानसभेची निवडणूक लढवण्यासाठी राजेंद्र मस्के तयारी करत आहेत.आगामी बीड विधानसभा निवडणुकीत उमेदवारी मिळावी यासाठी पक्ष नेतृत्वाकडे मागणी केली होती. परंतु प्रतिसाद नसल्याने अपक्ष निवडणूक लढवण्याची तयारी सुरू केली. यापूर्वी संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्याकडे उमेदवारीची मागणी केलेली आहे. पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर प्रथमच जरांगे पाटलांची सदिच्छा भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

**योजना** | **मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा**

# लाडक्या बहिणींना लागणार लॉटरी



### मुख्यमंत्री नेमकं काय म्हणाले?

एकनाथ शिंदे यांनी मुक्ताईनगरमध्ये आयोजित महायुतीच्या मेळाव्यात चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. यावेळी बोलताना त्यांनी विरोधकांवर जोरदार हल्लाबोल केला. ‘गुलाबराव पाटील साहेब आता आमदार चंद्रकांत पाटील यांच्याकडे लक्ष द्या, वीस नोव्हेंबरला विरोधकांच्या बुडाखाली फटाके फोडायचे आहेत. २३ नोव्हेंबरला ऑटोम बॉम्ब फोडायचा आहे. चंद्रकांत पाटील बाळासाहेबांचे कडवट शिवसैनिक आहेत. गेल्या दोन वर्षांमध्ये पाच हजार कोटींचा निधी दिला आहे, असं यावेळी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले.

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुक्ताईनगरमध्ये आयोजित महायुतीच्या मेळाव्यात बोलताना आमदार चंद्रकांत पाटील यांना पुन्हा एकदा उमेदवारी जाहीर केली आहे. चंद्रकांत पाटील यांना उमेदवारी जाहीर करतानाच त्यांनी पुन्हा एकदा विरोधकांवर जोरदार हल्लाबोल देखील केला आहे. तसेच कुणीही लाडकी बहीण योजना बंद पाडू शकणार नाही, सावत्र भावांनी योजनेत खोडा घातला त्यांना जोडा नक्की दाखवा, लाडकी बहीण योजनेचे पैसे वाटत राहणार,लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढत राहणार असंही यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, आचारसंहिता संपली की डिसेंबरचा हफ्ता लाडक्या बहिणींना मिळणार आहे.कोणिही ही योजना बंद पाडू शकणार नाही. सावत्र भावांनी योजनेत खोडा घातला त्यांना जोडा नक्की दाखवा, लाडकी बहीण योजनेचे पैसे वाटत राहणार,लाडकी बहीण योजनेचे पैसे वाढत राहणार असंही यावेळी मुख्यमंत्री पान २ वर...

## राष्ट्रवादीत प्रवेशाचा ओघ सुरुच

**पक्षांतर:धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात प्रवेश**



परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीच्या तारखा जसजशा जवळ येत आहेत तसतसे राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वात विविध पक्ष आणि संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा धनंजय मुंडे यांचे नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाचा ओघ प्रचंड वाढला आहे.

एम आय एम पक्षाचे युवक आघाडीचे शहराध्यक्ष शेख उमर यांच्यासह एम आय एम चे युवक आघाडीचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्त्यांचा आज ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश संपन्न झाला. यावेळी वाल्मिक अण्णा कराड यांनी पक्ष प्रवेश देऊन सर्वांचे स्वागत केले व शुभेच्छा दिल्या. यावेळी एमआयएमचे उमर शेख यांच्यासह अरबाज पठाण, सोहेल शेख, आयान शेख, अजीम शेख, फिरोज शेख, तारीख शेख, ताहेर शेख, हमजा शेख, आमिर शेख, शहाबाज शेख, अरबाज शेख, लाला तांबोळी, जाहीर तांबोळी, सोहेल शेख, रोमन शेख, मुस्तकीन सय्यद, सय्यद निजाम, शेख समीर, मोजन शेख, शहाबाज पठाण, इरफान शेख, सोनू शेख, मुजफ्फर पान २ वर...

## आम्ही अडगेची राहू

गेले तीन दिवस 'लोकसत्ता'ने अभ्यासक्रम बदलाच्या प्रस्तावाबाबत विस्तृत वृत्तांत प्रसृत केले. निवडणुकीच्या साठमारीत मग्न असलेल्या राज्यातील राजकीय पक्षांस त्यावर भाष्य करण्यास वेळ नाही. तथापि हा विषय राजकारण्यांवर सोडून 'हलक्यात घ्यावा' (हे नवे 'हिंदा'ळलेले मराठी) असा नसल्याने त्यावर भाष्य आवश्यक ठरते. याचे कारण नवा, आदर्श, संस्कारक्षम अभ्यासक्रम राज्यभर लागू करण्याचे श्रेय घेण्याच्या नादात आचारसंहितेच्या आदल्या दिवशी नव्या अभ्यासक्रम आराखड्याचा अंतिम मसुदा जाहीर करण्यात आला. सरकारच्या लेखी महामंडळांवर कोणाची तरी वर्णी लावणे आणि पुढची पिढी घडवेल/बिघडवेल असा अभ्यासक्रम या दोन्हींचे मोल एकच! हा नवा मसुदा पाहिल्यास सक्षम मनुष्यबळाच्या रूपाने या देशाची 'नालंदा'पासूनची शैक्षणिक परंपरा पुढे जाण्याऐवजी शिक्षण विभागाने मुखभंगाची परंपरा राखल्याचा विश्वास नक्की मिळतो. अभ्यासक्रम आराखडा हा खरे तर अत्यंत शिस्तबद्ध, नेमका आणि देशाची, जगाची भविष्याची गरज लक्षात घेऊन रचलेला दस्तावेज असणे अपेक्षित आहे. मात्र, या तीनही मुद्द्यांचा अभाव या आराखड्यात दिसतो. अभ्यासक्रमात काय असावे, मुलांना नेमके काय शिकवावे, त्याचा स्तर कोणता असावा, त्यातून काय साध्य होणे अपेक्षित आहे, त्याबरहुकूम अभ्यास साहित्य कसे निर्माण करावे या मूलभूत बाबी तोंडी लावण्यापुरत्या आणि फुकाची बौद्धिके या आराखड्यात सढळ आहेत. हिऱ्याच्या अपेक्षेने एखादे आकर्षक वेष्टन उघडावे आणि आत गारगोटी असावी तसेच हे.

या देशातील, जगातील यापूर्वीच्या शिक्षण धोरणकर्त्यांनी तयार केलेली रचना मोडीत काढण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून देशभरात नवे शिक्षण धोरण लागू करण्यात आले. आपल्या परिसरात बोलली, वाचली जाणारी भाषा, जगात सर्वाधिक पातळीवर मान्यता पावलेली इंग्रजी भाषा आणि अजून एखाद्या स्थळ, काळातील ज्ञानाची कवाडे खुली व्हावीत यासाठी तिसरी एखादी अतिरिक्त भाषा अशी भाषा रचना, जगण्यासाठी अत्यावश्यक असणारी आकडेमोड शिकवणारे, तर्कसुसंगत विचार, प्रश्न सोडवण्याची कुवत निर्माण करणारे गणित, भोवतालच्या घटनांची सुसंगती लावून त्याचे मूळ शोधण्यासाठी प्रवृत्त करणारे विज्ञान, भोवताल, तेथील परिस्थिती, हवा, माती यांचे भान वाढवणारा भूगोल, सामाजिक भान निर्माण करणारा आणि चुका टाळण्याची शिकवण देणारा इतिहास, कायदे, प्रशासन, व्यवस्था याची ओळख करून देणारे नागरिक शास्त्र आणि आर्थिक साक्षरतेचा पाया रचण्यासाठीचे अर्थशास्त्र हे किमान आवश्यक विषय वयाच्या सोळाव्या किंवा सतराव्या वर्षाच्या टप्प्यापर्यंत मुलांना कळणे हे त्यांच्या भविष्यासाठी आवश्यक आहे. असा विचार पूर्वीच्या धोरणकर्त्यांनी मांडला. नवा अभ्यासक्रम तयार करताना पूर्वीप्रमाणे प्रचलित विषयांचे बंधन झुगारणे समितीला शक्य झाले नाही. ते झुगारणे व्यवहार्यही ठरले नसते. मात्र ते इतके अधिक करकचून बांधले गेले की तिसरी भाषा निवडण्याचीही मुभा वगळून हिंदीही बंधनकारक करण्यात आली. त्यामागे 'एक देश, एक निवडणुका'प्रमाणे 'एक देश, एक भाषा' हाच विचार दिसतो.त्याच्या जोडीने वेगळेपण ठसवण्यासाठी नव्या विषयांची चळत मांडण्यात आली खरी. ते विषय आकर्षक. मात्र, त्यांची आवश्यकता किती याचा विचार शून्य. नववीच्या विद्यार्थ्यांसाठी समाजातील महत्त्वाच्या व्यक्ती असा स्वतंत्र विषय बंधनकारक आहे. मग इतिहासात वेगळे काय असते? परंतु इतिहासातील नेहरूंची कर्तबगारी जाचू लागल्यामुळे पाठ्यपुस्तकांतून ती हळूहळू कमी करण्यात आली. पर्यावरण, जलसुरक्षा असे विषय विज्ञानात, भूगोलात होतेच. नळ दुरुस्ती करण्यासाठी भौतिकशास्त्राचा पाया किंवा सुतारकामासाठी भूमिती कळणे गरजेचे असते. पण या मूलभूत विषयांचे तास कमी आणि अतिरिक्त विषय मात्र वारेमाप. त्याचे कारण काय? थोडक्यात लिहिता येते कारण हात वळतो परंतु वाचता येत नाही ही स्थिती भविष्यकालीन धोक्याची चाहूल देणारी आहे. मुळात शिकणे महत्त्वाचे की सत्ताधाऱ्यांना हवे तेव्हा, हवे तितकेच शिकवता येणे महत्त्वाचे ? हा प्रश्न पडण्याचे आणखी एक कारण म्हणजे बदललेले शैक्षणिक वेळापत्रक. उन्हाळी सुट्टीत शाळा-सुटी-शाळा हे बिनडोकपणाचे आहे. असे बिनडोकी प्रस्ताव या धोरणात विपुल. त्यात शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांचा हात किती आणि त्यांच्या कार्यालयाचे खरे नियंत्रण असणाऱ्यांची 'साठे'मारी किती हा खरा यातील कळीचा मुद्दा.

# हायकोर्टाचा आदेश तरीही रुजू केले नाही!

## कारवाई: न्यायालयाचा अवमान केल्याची याचिका दाखल

परळी/ पुण्यभूमी प्रतिनिधी औरंगाबाद हायकोर्टाने आदेश दिल्यानंतर सुद्धा परळी तालुक्यातील सिरसाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक उर्दू शाळेवर अंशकालीन कार्यानुभव निदेशकास बीड शिक्षण विभागाने रुजू करून घेतले नाही. एक प्रकारे औरंगाबाद हायकोर्टाचा हा अवमान असून लवकरच बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी, शिक्षणविस्तार अधिकारी बीड,परळी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी आदी अधिकार्यावर अवमान याचिका दाखल करण्यात येणार असल्याचे या प्रकरणातील पीडित अंशकालीन निदेशक शेख नजीर यांनी म्हटले आहे.




परळी तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू , सिरसाळा या शाळेवर अंशकालीन निदेशक एका शिक्षकाची भरती करायची होती. परंतु गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने दोन शिक्षकांना नियुक्तीपत्र दिल्याने गोंधळ निर्माण झाला असून याप्रकरणी अन्याय झालेल्या शिक्षकांनी औरंगाबाद हायकोर्टात धाव घेतल्यानंतर हायकोर्टाने संबंधित अन्यायग्रस्त शिक्षकांना रुजू करून घेण्याचे आदेश दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी राठोड व इतर १००७७/२०२४ दिले आहेत.या आदेशानुसार शिक्षणाधिकारी बीड यांनी न्यायालयाच्या निकालानुसार संबंधितांना रुजू करून घेण्याचे पत्र बीड जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी यांनी दिनांक परळीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी तसेच त्यानंतर ९ ऑक्टोबर २०२४ शेख नजीर इब्राहिम यांना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू सिरसाळा येथे रुजू करून घेण्याचा आदेश लेखी दिला होता. परंतु त्याला गटशिक्षणाधिकारी कार्यालय परळी यांनी केराची टोपली दाखविली.

याबाबत अधिक माहिती अशी की, परळी तालुक्यातील सिरसाळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा उर्दू या शाळेवर परळी पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या वतीने प्रथम ७ ऑगस्ट २०२४ रोजी शेख नजीर इब्राहिम यांना कार्यानुभव अंशकालीन निदेशक म्हणून नियुक्तीपत्र दिले. परंतु लागलीच दुसरे नियुक्तीपत्र काही दिवसानंतर दिनांक २४ ऑगस्ट २०२४ रोजी शेख नजीर यांच्या जागेवर दुसऱ्याला गटशिक्षणाधिकारी यांनी नियुक्तीपत्र देऊन नवा वाद निर्माण केला. शेख नजीर इब्राहिम व प्रकाश राठोड व इतर १२ जणांनी औरंगाबाद हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर दिनांक १३ सप्टेंबर २०२४ रोजी औरंगाबाद हायकोर्टाने ८ मे २०२४ च्या नियमानुसार शेख नजीर व इतरांना सामावून घेण्याचा आदेश दिला.

व त्यांना कार्यमुक्त करण्यात येऊ नये असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.यानंतर शेख नजीर यांनी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून रुजू करून घ्यावे असा लेखी अर्ज दिला होता. हायकोर्टाच्या स्पष्ट आदेशानंतरही परळी गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने नियुक्तीपत्र न देता परत दिनांक २७ सप्टेंबर २०२४ रोजी शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग बीड यांनी परळीच्या गटशिक्षणाधिकाऱ्यांना रुजू करून घेण्याचे पत्र पाठवले होते . यावर बीड जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांनी शेख नजीर यांना वैयक्तिक रुजू करून घ्यावे असे पत्र ९ ऑक्टोबर २०२४ रोजी दिले. परंतु त्या पत्रानंतरही परळीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयाने अजूनही कोणतीही कारवाई न करता शेख नजीर यांना रुजू करून घेतलेले नाही. त्यामुळे आता माझ्यासमोर आत्मदहनाशिवाय पर्याय नाही असे शेख नजीर यांनी म्हटले आहे.

## पान एक वरून

**जागावाटपाचा तिढा**

यांनी महत्त्वाची माहिती दिली.२२ ऑक्टोबर ला तीन वाजता मुंबईत महाविकास आघाडीची बैठक होईल. त्यानंतर २५ तारखेला आमची एक बैठक होईल. महाविकास आघाडीच्या सर्व जागांचा तिढा सुटेल आणि आम्ही जागावाटप जाहीर करु असं चेन्निथला म्हणाले. तसंच आजच्या बैठकीत आम्ही ६३ जागांबाबत चर्चा केली. त्याबाबत अंतिम निर्णय झाल्यानंतर त्याची माहिती माध्यमांना दिली जाईल. मुंबईत आम्ही आमच्या मित्रपक्षांशी चर्चा केल्यानंतर यादी जाहीर करु असंही चेन्निथला म्हणाले.महाराष्ट्र विधानसभेच्या दृष्टीने आमची चांगली तयारी चालली आहे. जागांबाबत आमची चर्चा सुरु आहे. तसंच आमच्यात कुठलेही मतभेद किंवा वाद नाहीत. राहुल गांधी, प्रियांका गांधी हे देखील प्रचार करतील असंही चेन्निथला यांनी म्हटलं आहे. आघाडी म्हटलं की अशा प्रकारच्या काही गोष्टी होत असतात. पण आमचा अंतिम निर्णय २५ तारखेपर्यंत होईल असंही चेन्निथला यांनी स्पष्ट केलं.

**महाराष्ट्रात फक्त गुलाबी**

आहे. तसंच महायुतीचं सरकार येणार हा विश्वासही व्यक्त केला आहे. विकासाचा राष्ट्रवादी विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्यासाठी, आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्टार प्रचारकांची यादी जाहीर करण्यात येत आहे, असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार ( -क्षळीं झरुरी ) यांनी जी स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे ते प्रचारक राष्ट्रवादीचा प्रचार करताना दिसतील.

**राज ठाकरेंकडून पहिली**

मी दोघांचे उमेदवारी अर्ज भरण्यासाठी येत आहे, अशी माहिती राज ठाकरे यांनी दिली. कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे मनसेचे आमदार प्रमोद उर्फ राजू पाटील यांच्या निवडणूक मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन करण्यासाठी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे सोमवारी डोंबिवलीतील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील मानपाडा येथे आले होते. कल्याण ग्रामीणमधून मनसेतर्फे राजू पाटील हे एकमेव उमेदवारीचे दावेदार आहेत. तेथेच त्यांनी राजू पाटील आणि अविनाश जाधव यांच्या नावांची घोषणा केली.लोकसभा निवडणुकीच्यावेळी मनसेने शिवसेना, भाजप आणि राष्ट्रवादी (अजित पवार) पक्ष या महायुतीला बिनशर्त पाठिंबा दर्शवला होता. आता विधानसभेसाठी राज ठाकरे यांनी स्वतंत्र भूमिका घेऊन महायुती सोबत न राहता आपले उमेदवार उभे करण्याची तयारी केली आहे. त्यामुळे लोकसभेच्या काळात महायुतीबरोबर असणाऱ्या राज ठाकरे यांच्या मनसेच्या उमेदवारांचा सामना आता भाजपा, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबरोबर असणार आहे.लोकसभा निवडणुकीच्यावेळी कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघातून मनसेचे आमदार राजू पाटील यांनी कल्याण लोकसभेतील महायुतीचे उमेदवार खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासाठी झटून काम केले होते. कल्याण ग्रामीणमध्ये महायुतीला नकारात्मक वातावरण असुनही स्थानिक शिवसेना कार्यकर्ते, आमदार पाटील यांनी झटून केलेल्या कामामुळे खा. शिंदे यांचे या भागातील मताधिक्य वाढले होते.आता महायुतीमधून मनसे बाहेर पडल्याने राजू पाटील यांना कल्याण ग्रामीणमध्ये एकाकी लढत द्यावी लागणार आहे. या मतदारसंघात राजू पाटील दुसऱ्यांदा निवडणूक लढवित आहेत. यापूर्वीच्या निवडणुकीत ते दिवा भागाने दिलेल्या साथीने सहा ते सात हजाराच्या फरकाने निवडून आले होते.

**लाडक्या बहिणींना**

एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. सुशिक्षित बेरोजगारांना आपण पैसे देवू लागलो आहोत, सरकारी तिजोरीवर पहिला अधिकार बळीराजाचा आहे, त्यामुळे नुकसान झालं तर त्यांना आपण वाऱ्यावर सोडणार नाही. चंद्रकांत पाटलांना पन्नास हजारांपेक्षा जास्तीची लीड मिळाली पाहिजे, महायुतीचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांना विजयी करा, असं यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे.

**राष्ट्रवादीत प्रवेशाचा**

कुरेशी, पूर्वान पठाण, जाहीर पठाण, सोहेल खान, समीर पठाण, जुनेद शेख, रोहिन खान, मोजम कुरेशी, दनियल खान, सुलतान पठाण, आरिफ शेख, मेहबूब भाई, सलमान शेख, मुजाहिद शेख, तोफिक शेख, सय्यद साबीर, शेख इस्माईल, शेख फरीद, शेख अझहर, शेख अजीम, सय्यद राजू , अरबाज कुरेशी, अजहर कुरेशी, जुबेर खान, समीर खान, अर्षद शेख, नाझीरखान, आयान शेख, जावेद सय्यद, सय्यद गुलमाल, सय्यद सलमान, अरबाज खान, असलम कुरेशी, मोबीन खान, नसीर पठाण, शेख चांद, मुक्तार सय्यद, मुस्तकीन बागवान, दिशान बागवान यांसह असंख्य कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.

## पान सहा वरून

**तुतारीकडील आवक**

ऋषिकेश बदने, करण राठोड, तुषार बदने, सुभाष बदने, संजय बदने, भरत बदने, सुगनावा बदने, सिद्धेश्वर अघाव, भागवत आंधळे, दशरथ कातकडे, श्रीराम आंधळे, ज्ञानेश्वर गुट्टे, गणेश गुट्टे, विलास गुट्टे, संग्राम आंधळे, शंकर आंधळे, वैभव आंधळे, बाबासाहेब कसबे, हनुमंत आंधळे, भरत बदने, संतोष बदने, सिद्धेश्वर घुले, दिलीप बदने, वैजनाथ बदने, सुनील बदने लक्ष्मण बदने, शिवाजी बदने, गोविंद बदने, नागोराव बदने, महादेव बदने, यांच्यासह शेकडो ग्रामस्थांनी प्रवेश केला. दादाहरी वडगाव येथील सिद्धेश्वर आघव तर बरकत नगर नगर (मोमीन पुरा) येथील कलीम शेख, शेख वली, सेहनावाज कुरेशी, समीर शेख यांच्या नेतृत्वाखाली परवेज शेख, आसिफ शेख, दाऊद शेख, जुबेर शेख, मझार शेख, वासिम शेख, शेख वल्ली, सय्यद सुनो, मुस्तफा शेख, सय्यद सलमान, साजिद कुरेशी, शेख नानू, शेख सुनो, मुख्तार शेख, रोहित रौबोडे,कलीम शेख, वल्ली शेख, शाहनवाज कुरेशी, कलीम सय्यद, आदिल सय्यद, तौफिक शेख, सय्यद रेहान, समीर शेख, जुबेर शेख, सय्यद जुबेर, शेख सोहेल, गुळलो शेख, शेख दिशान, शेख तला, शेख जुनेद, शेख रोमन, शेख जब्बार, आदिल शेख, शेख तौफिक, शेख अरिफ, शेख शकील, सय्यद अलीम, शेख इरफान, सय्यद आजम, शेख नॅय्युम, तौफिक पठाण, सोहेब शेख, शेख आवेश, सय्यद बाबाजानी, शेख जाय, शेख रफिक, सलीम सय्यद, अझर शेख, जुबेर सय्यद, मुस्तकीम शेख, मझहार शेख, निहाल शेख, शेख सय्यद, शेख रौफ, शेख इसाक, अबुझर कुरेशी, सिद्दीकी शेख, साहिल पठाण, अफरोज सय्यद,अमान शेख, अश्फाक शेख, शेख लालू यांनी जाहीर प्रवेश केला. तसेच काकर मोहल्ला येथील शारुख काकर, रिहान काकर यांच्या उपस्थितीत इरफान काकर, नावीद काकर, अझर काकर, राजा काकर, जुनेद काकर, बिलाल काकर, मुजीद काकर, अयुब काकर, मुसा काकर, आशु काकर, साहिल काकर, जाहिद काकर, अश्फाक काकर, असलम काकर, सुभान काकर, इम्रान काकर, साद काकर,अर्शद काकर, अबू काकर, असिफ काकर, सोहेब कुरेशी, साहिल सलीम काकर, साद युनूस काकर, अकबर मसालेवाले, फैजल काकर, याकूब काकर, निजवान काकर, सोफियान काकर, मोबीन काकर, साहेबाज काकर, इम्रान काकर, अक्रम काकर, बिलाल काकर, सोहेल काकर, इम्रान काकर, मुसेफ काकर, असद काकर, अलान काकर यांनी जाहीर प्रवेश केला.

**अपघात प्रमाण वाढले, गुन्हा**

फलक लावलेले नसून रात्रीच्या वेळी वाहन चालकांना समजण्यासाठी दिवे किंवा साईन-ग्लो बोर्ड लावलेले नसल्याने येथे अपघात होत आहेत. त्यामुळे या रस्त्याचे काम करणारी एचपीएम कंपनी व महामार्ग प्राधिकरण यांच्यावर सदोष मनुष्यवध आणि निष्काळजीपणामुळे प्रवाशांच्या जीवितास धोका निर्माण करण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न करणे. अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.या टोल नाक्यावर अर्धवट काम राहिले असल्यामुळे रस्त्यावर खड्डे असल्याने चोरीचे देखील प्रमाण वाढले आहे. सदर कंपनीस वारंवार प्रशासनाने सूचना देऊन देखील सदर कंपनी हे जाणीवपूर्वक सदरचे खड्डे बुजवण्यास व मातीचे भेग उचलल्यास टाळाटाळ करत आहेत असेही या भागातील नागरिकांतून बोलले जात आहे.

**लोणार येथे फिरते**

वस्तुसंग्रहालयाची इमारत मुंबईतील हेरिटेज श्रेणी -संवर्गातील इमारत असून सन २०२२ मध्ये 'द युनेस्को ऐशिया पॅसिफिक अवॉर्ड्स फॉर कल्चरल हेरिटेज कॉन्झर्व्हेशन'च्या अंतर्गत 'अवॉर्ड ऑफ एक्सलन्स' हा जागतिक पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. मुंबईतील व्हिक्टोरियन आणि आर्ट डेको समूहाचा भाग असलेले वस्तुसंग्रहालय, २०१८ साली युनेस्को जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केले गेले. २०१९ साली वस्तुसंग्रहालयाला इंडियन ग्रीन बिल्डिंग कौन्सिलचे सर्वोच्च (प्लॅटिनम) मापन पर्यावरण व्यवस्थापनाचे जागतिक नेतृत्वाकरिता बहाल करण्यात आले. एका ऐतिहासिक इमारतीत आणि एका ऐतिहासिक परिसरात स्तिथ असलेले छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय बहुदा पहिले संग्रहालय असेल ज्याला अशी वैशिष्ट्य लाभली आहेत.सिटी-सी.एस.एम.व्ही. एस् फिरते म्युझियम संपर्क अभियान हा उपक्रम सुरू करून आता ८ वर्षे झाली आहेत. या उपक्रमाद्वारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचणे हा संग्रहालयाचा उद्देश आहे. यासाठी दोन अत्याधुनिक साधनांनी युक्त आशा २ बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे. या बसेस शहरी तसेच ग्रामीण भागांतही विविध ठिकाणी नेल्या जातात. बसेसमध्ये विविध विषयांवरील प्रदर्शने भरविली जातात जे वेळोवेळी बदलतात. या बसेस वातानुकूलित असून त्यांमध्ये कालाकृतींचे प्रदर्शन करण्यासाठी आवश्यक अशा शोकेसेस, इंटरक्टीव डेमो किट्स, दृक्-श्राव्य संसाधणे आणि डिजिटल माध्यमयुक्त साधनेही उपलब्ध आहेत. या बसेसमध्ये प्रवेश करण्यासाठी विकलांग व्यक्तींसाठी किंवा व्हीलचेअर वापरणाऱ्या व्यक्तींसाठी आवश्यक अशा रॅम्पचीही व्यवस्था आहे. तसेच सुरक्षिततेसाठी सीसीटीव्हीची ही व्यवस्था आहे.या बसेस महाराष्ट्र, गोवा, गुजरात, कर्नाटक, दिल्ली व हरियाणा या राज्यांमध्ये गेल्या आहेत. शाळा, महाविद्यालये, सांस्कृतिक संस्था, संग्रहालये, ऐतिहासिक महत्त्वाच्या जागा, तसेच रहिवासी सोसायटीज् मध्येही या बसेस बोलविल्या जाऊ शकतात, ज्यामुळे मुलांना या प्रदर्शनाचा लाभ होईल. यातील पहिल्या बससाठी केंद्रीय सांस्कृतिक मंत्रालयाने सहाय्य केले होते तर सिटी समूहानेही उपक्रम राबवण्यासाठी आर्थिक सहकार्य केले. २०१९ मध्ये सिटीच्या सहाय्याने दुसरी बस यांत सामील केली गेली. ही सर्व प्रदर्शन आणि त्यासोबतचे कार्यक्रम विनामूल्य उपलब्ध असतात.बसेसमध्ये विविध ऐतिहासिक, कलाविषयक, शास्त्रीय तसेच सामाजिक विषयांवरची मनोरंजक, माहितीपूर्ण व इंटरक्टीव प्रदर्शने आहेत. प्रत्येक प्रदर्शनात संग्रहाल- यातील विशाल संग्रहित कलाकृतींच्या निवडक प्रतिकृति, त्यांच्याविषयीची संपूर्ण माहिती, इंटरक्टीव, डिजिटल व स्वतः करून पहावयाच्या इंटरक्टीवज, क्टीविटी शीटस् व माहिती पत्रिका असतील. आमचे प्रतिनिधि सर्व सुविधा पुरवतील आणि प्रदर्शनांविषयी तसेच निगडीत उपक्रमांबद्दल माहिती देतील. ते विद्यार्थ्यांसाठी आणि शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींसाठी विशेष कार्यशाळा देखील आयोजित करतात जेणेकरून अर्थपूर्ण संवादांना तसेच प्रदर्शनात दर्शविलेल्या विचारांचे समन्वेषण करण्यास प्रोत्साहन मिळते.या फिरते वस्तुसंग्रहालयाचे सर्व लोणार वासी आणि पर्यटक यांनी लाभ घ्यावा असे आव्हान साहेबरावजी पाटोळे यांनी केले. या प्रसंगी वेळी मा. उपाध्यक्ष न. प. लोणार बादशाह खान, ओ. बी. सेल जिल्हाध्यक्ष प्रा. गजानन खरात, शहर अध्यक्ष कॉ. क. लोणार शेख समद भाई, शहर उपाध्यक्ष विकास मोरे,मनीष पाटोळे,गोरखनाथ अंभोरे,जाकीर शेख,करामत भाई,शेख जमीर तसेच लोणार शहरातील बहुसंख्य नागरिक आणि पर्यटक हे उपस्थित होते.

**रिपाइं महायुती विरोधात**

आहे का?अश्या दलीत समाजात शब्दात महायुतीबदल तीव्र प्रतिक्रिया येत आहेत.बीड जिल्ह्यात ठ्झख चे सर्व कार्यकर्ते नाराज झालेले आहेत त्यामुळे बीड जिल्हात महायुतीचे उमेदवार असतील तिथे ठ्झख महायुतीचे कोणतेही काम करणार नाही महायुतीच्या विरोधात सर्व कार्यकर्ते काम करणार आहे येणाऱ्या विधानसभा निवडणुक सह सर्वच निवडणुकीत काळात ठ्झख ची ताकद दाखवुन दिल्याशिवाय राहणार नाहीत असे ठ्झख महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मयाताई मिसळे यांनी म्हणले आहे.

**शिवसंग्रामकडून निर्णयाचे**

प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे यांनी व्यक्त केले.तसेच या बैठकीत उपस्थिताशी संवाद साधताना शिवसंग्राम जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद यांनी पुढील वाटचाल आणि संघटना बांधणीवर कार्यकर्त्यांशी चर्चा करत शिवसंग्राम एकसंघ डॉ. ज्योतीताई मेटे यांच्या सोबत असल्याचा विश्वास दिला. या प्रसंगी शिवसंग्राम प्रदेश उपाध्यक्ष प्रभाकर कोलंगडे, प्रदेश सरचिटणीस नितीन लाठकर, जिल्हाध्यक्ष नारायणराव काशीद, जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, शहर अध्यक्ष सुहास पाटील, जिल्हा उपाध्यक्ष रामदास नाईकवाडे, बीड विधानसभा प्रमुख प्रा.सुभाष जाधव, मा.पंचायत समिती सभापती ज्ञानेश्वर कोकाटे, बीड तालुका अध्यक्ष नवनाथ प्रभाळे, गेवराई तालुका अध्यक्ष कैलास माने, आष्टी तालुका अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी,अंबेजोगाई तालुका अध्यक्ष धनेश गोरे,शिरूर तालुका अध्यक्ष माऊली शिंदे, महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा मनीषा कुपकर, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक पंडित माने, सचिन कळकुटे, मजूर सहकारी संस्थेचे संचालक बाळासाहेब हावळे, खरेदी विक्री संघाचे संचालक गोपीनाथ घुमरे, मा. नगरसेवक दत्ता गायकवाड यांच्या सह सर्व आघाड्यांचे जिल्हाध्यक्ष , सरपंच , ग्रामपंचायत सदस्य सह कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गेवराई पंचायत समिती**

अधिकारी म्हणून गणेश जोगदंड यांची चर्चा आहे. आचारसंहितेच्या काळामध्ये ही लाभार्थ्यांना वेळोवेळी व जागोजागी मदतीचा हात देत आहे. फोनवर जास्त फोन येत असल्याने व्हाट्सअप च्या माध्यमातून लोकांशी संवाद साधत आहे व लाभार्थ्यांचे कामे रोखत नसल्याने अशा अधिकाऱ्याची गरज असल्याचे प्रतिक्रिया नोंदवली जात आहे.

**धारुरमध्ये वंचितचा**

महासचिव अभिजीत वावळ, अमोल बनसोडे बाळासाहेब उजगरे शहराध्यक्ष आकाश गायसमुद्रे, कपिल उजगरे, पप्पू उघडे सचिन ढोबळे व मोठ्या संख्येने धारूर तालुक्यातील पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रानबा उजगरे यांनी केले यांनी केलं. आभार प्रदर्शन अभिजीत वावाल यांनी केले.

**नमितावर सगळेच**

सर्वजण विद्यमान आमदार नमिता अक्षय मुंदडा यांना १००% यांना घरी बसवणार असल्याच्या अंबाजोगाई शहरातील या चर्चेला मात्र जागोजागी उधान आले असून, बैठकीतील घेतलेले निर्णय साक्षात खरे ठरतात का नाही हेच पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**
हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

दैनिक बीड
# पुण्यभूमी

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

मंगळवार,दि.२२ऑक्टोबर २०२४

बी.एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के



## मुझे हलके मे मत लेना बाजी पलट भी सकती हैं!

# बाबरी मुंडे म्हणाले आपण निवडणूक लढविण्यावर ठाम

बाबरी मुंडे, तरुणांमध्ये तुफान क्रेझ असलेले व्यक्तिमत्त्व

आता निवडणूक रिंगणातून कदापिही माघार नाही!





# माजलगाव मतदार संघात ओबीसी फॅक्टरमुळे विजय निश्चित

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

राज्याच्या राजकारणात, कमालीची उलथापालथ झाली आहे. कोण, नेता कोणत्या पक्षात जाईल याचा काही नेम नाही. त्यामुळे राज्याच्या राजकारणात डोकावून पाहिले तर एक गोष्ट स्पष्टपणे दिसून येते की, प्रस्थापित लोकांनी विस्थापित लोकांना सत्तेत येण्यापासून रोखण्याचे काम केले. परंतू यंदाची विधानसभा निवडणूक प्रस्थापित लोकांना अतिशय जड जाणार असल्याचे दिसते. कारण बाबरी मुंडे सारखे तरुण निवडणूक रिंगणात उडी घेतांना दिसत आहेत. एवढेच नव्हे तर पक्षाने उमेदवारी देण्यास डावलले तरीही अपक्ष राहून निवडणूक लढवू अशी ठाम भूमिका घेतली आहे. त्यामुळे प्रस्थापित लोकांना मोठे आव्हान ठरणार आहे. माजलगाव मतदार संघात ओबीसी फॅक्टर असल्याने बाबरी मुंडे सारखा तरुण आमदार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. खरंतर बाबरी मुंडेंसारख्या तरुणांना हलक्यात घेऊन चालणार नाही, कारण बाजी पलट भी सकती हैं, असेच म्हणावे लागेल. माजलगाव मतदार संघात बाबरी मुंडे, यांना अतिशय लोकप्रियता आहे. त्यांना अगदी लहान वयापासून समाजकारण आणि राजकारण बऱ्यापैकी ठाऊक आहे. बाबरी मुंडे यांच्याकडे पंकजा मुंडे यांचे खंदे समर्थक म्हणून पाहिले जाते. सर्वसामान्य माणसांशी नाळ जोडून बाबरी मुंडे मनामनात खोलवर रुजलेले आहेत. त्यामुळे माजलगाव मतदार संघाच्या निवडणूकीत जात-पात मुद्द्यांवर मते विभागली गेली तरी देखील त्यांचे पारडे जड राहील असेच आहे. पूर्ण ताकदीने माजलगाव मतदार संघात आपण उतरलो आहोत, असा निश्चय बाबरी मुंडे यांनी कधीच केला असून अवघा मतदार संघ पिंजून काढला आहे. माजलगावमध्ये एकाच कुटुंबातील व्यक्तींना किती दिवस संधी देणार आहात. आमच्यासारख्या विस्थापित युवकांना एकदा संधी देवून पहा, आम्ही नक्कीच तुमच्या विश्वासास पात्र ठरु, या मतदार संघाचा इतिहास बघितला तर कळते की, परक्यांना देखील इथल्या मतदार मायबाप जनतेने विधानसभेत पाठविले.त्यामुळे यंदा जनतेने तुमचा म्हणून संधी द्यावी, असे आवाहन बाबरी मुंडे गाव-भेटीत करत असल्याने त्यांना लोकांची पसंती मिळत असल्याचे दिसून येते.

## वडवणी तालुक्याला संधी...

माजलगाव विधानसभा मतदार संघाची पहिली सार्वत्रिक निवडणूक १९६२ साली झाली होती.त्याला आज ६२ वर्ष पूर्ण होत आहेत. या प्रदिर्घ काळात एखदाही वडवणी तालुक्याचा आमदार झालेला नाही. मात्र यंदा बाबरी मुंडे यांच्या रुपाने तशी संधी मिळणार आहे. त्यामुळे वडवणी तालुक्यातील मतदार बांधवांनी बाबरी मुंडे यांच्या पाठीशी उभा राहण्याचा पक्का इरादा केल्याने, त्यांचे पारडे जड झाले आहे.

## मायबाप जनता माझ्या पाठीशी!

बाबरी मुंडे म्हणाले की, माजलगाव विधानसभा निवडणूक लढविण्याचे मोठे धाडस करतो आहे. कारण या मतदार संघातील मायबाप जनता माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे. त्यांचे आशीर्वाद घेवून निवडणूक रिंगणात उतरलो आहे. त्यामुळे विजयाचे तोरण नक्कीच बांधले जाईल यात काही शंका नाही.



## ओबीसी फॅक्टरचा फायदा

**माजलगाव मतदार संघात ओबीसी मतांचे गणित निर्णायक आहे.त्यामुळे ओबीसी समाजाचा कल ज्या बाजूने जाईल त्या बाजूने निकाल लागण्याचे संकेत आहेत. आतापर्यंतच्या इतिहासात वडवणी तालुक्याचा आमदार झाला नसल्याने, या बाबीचा प्लस पॉईंट बाबरी मुंडे यांना राहणार आहे. त्यामुळे विजयाच्या गणिताचा अंदाज बांधणे सहाजिक आहे.**









**सुविचार :** ज्ञान संग्रह करण्याचे प्रबळ साधन म्हणजे वाचन होय.

# पुन्हा खिचडी...?

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत आता चांगलाच रंग भरू लागला आहे. महिनाभरावर आलेल्या या निवडणुकीसाठी विविध पक्षांनी आपल्या उमेदवारांच्या अंतिम यादीवर शेवटचा हात फिरविण्याचे काम हाती घेतले आहे. भाजपने त्यात आघाडी घेत तब्बल ९९ उमेदवारांची पहिली यादी घोषितही केली आहे. येत्या एक-दोन दिवसात इतर पक्षांकडूनही मोठ्या प्रमाणात उमेदवार जाहीर केले जातील. एरवी उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत आपली अंतिम यादी ताटकळत ठेवण्याचे राजकीय पक्षांचे धोरण असते. संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी असे केले जाते, परंतु यावेळी तसे काही होणार नसल्याचे दिसते. उमेदवारांना प्रचारासाठी पुरेसा वेळ मिळावा आणि विजयाच्या बाबतीत संदिग्धता नसल्याचा संदेश मतदारांमध्ये जावा या हेतूने फारसा विलंब न करता किमान ज्या ठिकाणी सहकारी पक्षांसोबत मतभेद नाहीत त्या ठिकाणचे उमेदवार लवकर जाहीर करण्याकडे राजकीय पक्षांचा कल दिसत आहे. महायुती किंवा महाआघाडीमध्ये जागावाटप अंतिम टप्प्यात असल्याचे बोलले जात आहे. दोन्ही आघाड्यांमध्ये काही मोजक्या जागांवर अजूनही मतभेद असल्याचे दिसते, त्यावर चर्चा सुरू आहे आणि लवकरच त्यातूनही मार्ग काढला जाईल. अर्थात उमेदवारी जाहीर झाल्यानंतरही समाधान न झालेले उमेदवार कोणत्याही राजकीय पक्षाला नाही. अनेक ठिकाणी बंडखोरी होऊ शकते आणि हे गृहीत धरूनच याद्या जाहीर होतील. शेवटी उमेदवार निवडताना निवडून येण्याची क्षमता हाच सगळ्यात मोठा निकष असतो. त्यामुळे जिथे दोन किंवा अधिक उमेदवार इच्छुक आहेत तिथे त्यातल्या त्यात निवडून येण्याची ज्याची शक्यता अधिक आहे त्याला उमेदवारी दिली जाईल. भाजपने आपल्या पहिल्या यादीत उमेदवार बदलण्याची फारशी जोखीम घेतल्याचे दिसत नाही. जवळपास ऐंशी उमेदवार हे तिथले विद्यमान आमदारच आहेत. काही ठिकाणी भाजपने बदल केल्याचे दिसत असले तरी त्या ठिकाणी मोठी बंडखोरी होण्याची शक्यता तशी कमीच आहे. यथावकाश इतरही पक्षांचे उमेदवार निश्चित होऊन प्रत्यक्ष प्रचाराला सुरुवात होईल. यावेळी महायुती आणि महाआघाडीत चुरशीची लढत असल्याचे दिसून येत आहे. लोकसभा निवडणुकीनंतर राज्यात महाविकास आघाडीचे पारडे जड असल्याचे मानले जात होते, परंतु त्यानंतर दोन-तीन महिन्यात महायुतीने अथक परिश्रम करीत लढत बरोबरीवर आणण्यात यश मिळविल्याचे दिसते. शिवाय विधानसभा निवडणुकीत छोटे पक्ष, आघाड्या आणि काही ठिकाणी ताकदीचे अपक्ष उमेदवार निर्णायक भूमिका बजावत असतात. मतविभाजन हा विधानसभा निवडणुकीचा कळीचा मुद्दा असतो. याही वेळेस या लढतीत काही छोटे पक्ष, काही पक्षांनी एकत्र येत तयार केलेली आघाडी, संभाव्य बंडखोर अपक्ष उमेदवार प्रमुख लढतीत असलेल्या दोन्ही आघाड्यांसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे. या पृष्ठभूमीवर कोणत्याही आघाडीला स्पष्ट बहुमत मिळण्याची शक्यता थोडी धुसर वाटत आहे किंवा बहुमत मिळाले तरी ते काठावरचे असू शकते, परंतु दोन्ही आघाड्यांमध्ये तीन मुख्य पक्ष सामील आहेत, हे लक्षात घेता निवडणुकीनंतर पुन्हा काही वेगळे समीकरण तयार होते की काय याबाबतही निश्चित सांगता येत नाही. दोन्ही आघाड्यांमधील मुख्य सहा पक्षांपैकी एखाद्या पक्षाने निवडणुकीनंतर वेगळा विचार केला तर सगळी परिस्थितीच पालटू शकते. या पृष्ठभूमीवर मागच्या निवडणुकीनंतर जसे खिचडी राजकारण झाले तसेच याही वेळेस होणार नाही असे ठामपणे म्हणता यायचे नाही. महाराष्ट्रात बहुमताचा जादूई आकडा १४५ आहे, परंतु कोणताही एक पक्ष इतक्या जागा मिळविण्याची शक्यता नाही. भाजप सर्वाधिक जागांवर लढत देत आहे, परंतु भाजपला मागच्या कामगिरीची पुनरावृत्ती करता येईल की नाही याबद्दल शंकाच आहे आणि तितके मोठे यश मिळाले तरी शेवटी कोणत्या तरी एका किंवा दोन पक्षांचा पाठिंबा भाजपला घ्यावाच लागेल. महाविकास आघाडीतही तेच चित्र आहे. यावेळी कदाचित काँग्रेसची कामगिरी सुधारू शकते, परंतु काँग्रेसदेखील आघाडीतील इतर दोन पक्षांच्या पाठिंब्याशिवाय सरकार स्थापन करण्याच्या स्थितीत नसेल. त्या परिस्थितीत सत्तेची चावी हाती बाळगणारा पक्ष निर्णायक भूमिका बजावू शकतो, कदाचित सर्वाधिक आमदार निवडून आल्यानंतरही संबंधित मोठ्या पक्षाला सत्तेत दुय्यम स्थान स्वीकारावे लागू शकते. सध्या तरी हेच चित्र समोर येत आहे. सध्या तरी महाराष्ट्रातील खिचडी राजकारण बदलणार नसल्याचेच संकेत मिळत आहेत.

# द्विधा मनस्थिती...!

महाविकास आघाडीत जागावाटपाची चर्चा सुरळीत सुरू असल्याचे सांगितले जात असले तरी काँग्रेस आणि ठाकरे गटामध्ये काही जागांवरून प्रचंड मतभेद असल्याचे समोर आले आहे. हे मतभेद इतके टोकाला गेले की ठाकरे गटाने विधानसभेच्या सगळ्याच म्हणजे २८८ जागा स्वतंत्रपणे लढण्याचाही पर्याय चाचपून पाहायला सुरूवात केली आहे. त्यासंदर्भात ठाकरे गटाच्या नेत्यांची एक बैठकही ठमातोश्री'वर झाली. अर्थात महाविकास आघाडीतून बाहेर पडण्याचा निर्णय ठाकरे गटाला सद्यपरिस्थितीत परवडणारा नाही, परंतु आघाडीत आपल्याला मोठ्या भावाची भूमिका मिळायला हवी, हा या गटाचा आग्रह अजूनही कायम दिसतो. जागावाटपाच्या साठमारीत आपल्या वाट्याला अपेक्षेपेक्षा कमी जागा आल्या आणि त्यातही हमखास निवडून येऊ शकणाऱ्या जागांवर पाणी सोडावे लागले तर निवडणुकीनंतर आपल्याला कायम पडती भूमिका घ्यावी लागेल, ही भीती ठाकरे गटाला सतावत आहे. मविआसोबत राहून निवडणूक लढविली तर निवडणुकीनंतर इतर पर्यायदेखील मर्यादित होतील, वेगळी भूमिका घेणे जड जाईल किंवा अगदीच कमी आमदार निवडून आले तर पुन्हा एकदा 'शिंदे' प्रयोग होणारच नाही, याची खात्री नसल्यामुळे अधिक जागा लढवून अधिक आमदार निवडून आणण्याकडे ठाकरे गटाचा कल आहे. सत्तास्थापनेत आपलीच भूमिका निर्णायक असावी यासाठी ही सगळी धडपड सुरू आहे. राज्यातील राजकीय परिस्थितीच अशी आहे की प्रत्येक पक्ष दुसऱ्याकडे संशयाने पाहत आहे. सध्या सोबत आहेत, परंतु निवडणुकीनंतर सोबत राहतीलच याची शाश्वती नसल्यामुळे काही पक्ष निवडणुकीनंतरच्या समीकरणावरही लक्ष ठेवून आहेत. ठाकरे गटालाही आपल्या हाती हे सगळे पत्ते असावेत असे वाटते आणि त्यासाठी किमान पन्नास आमदारांचे बळ आपल्या पाठीशी असावे, असे उद्धव ठाकरेंना वाटत असेल तर त्यात चुकीचे असे काही म्हणता येणार नाही. तुर्तास ठाकरे गटाने महायुतीत परतण्याची सगळी दारे बंद केली आहेत, परंतु महाविकास आघाडीसोबत प्रामाणिकपणे राहण्यासाठी घेतलेली ही कठोर भूमिका भविष्यात आपलाच घात करणार नाही ना, ही भीती वाटत असल्याने सध्या ठाकरे गटात प्रचंड घालमेल असल्याचे दिसते.

## भूमिका

# महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक व जनतेचे कर्तव्य!



डॉ. मंगेश गोविंदराव आचार्य
8550971310
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
अंत्योदय महाविद्यालय, देवग्राम

२० नोव्हेंबर २०२३ रोजी महाराष्ट्रात विधानसभेच्या निवडणुका पार पडणार आहेत. राज्यात आदर्श आचार संहितेचा कार्यान्वयन सुरू झालेले आहे. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार असून, राज्यातील एकूण २८८ जागांसाठी ही प्रक्रिया चालणार आहे.

महाराष्ट्राच्या राजकीय जडणघडणीत या निवडणुकांचे विशेष स्थान आहे. २२ ऑक्टोबर रोजी निवडणूक अधिसूचना जाहीर होईल, यानंतर २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख आहे. यानंतर ३० ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी होईल आणि ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारांना अर्ज मागे घेण्याची संधी मिळेल. निवडणुकीच्या प्रक्रियेत महत्त्वाचे म्हणजे २५ नोव्हेंबर रोजी सर्व निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल, ज्यामुळे २६ नोव्हेंबर रोजी विधानसभेचा कार्यकाळ संपुष्टात येईल.

राज्यात एकूण ३६ जिल्हे असून, २८८ जागांपैकी २३४ जागा सर्वसाधारण उमेदवारांसाठी आहेत. अनुसूचित जमातींसाठी २५ आणि अनुसूचित जातींसाठी २९ जागा राखीव आहेत. राज्यातील मतदारांची संख्या ९.६३ कोटी असून, त्यामध्ये ४.९७ कोटी पुरुष आणि ४.६६ कोटी महिला मतदारांचा समावेश आहे. यामुळे निवडणुकीतील विविधता आणि लोकशाहीतील सहभागाची महत्त्वाची साक्ष मिळते.

यंदाच्या निवडणुकीत १ लाख १८६ मतदान केंद्रे उभारण्यात येणार आहेत, ज्यात शहरी भागातील ४२,६०४ आणि ग्रामीण भागातील ५७,५८२ केंद्रे असतील. विशेष म्हणजे, ५३० मॉडेल मतदान केंद्रांची योजना आहे, ज्यामुळे मतदारांना अधिक सुव्यवस्थित आणि आरामदायक मतदान अनुभव मिळेल. यावेळी १८.६७ लाख मतदार पहिल्यांदाच मतदान करणार आहेत, तसेच ६ लाख २ हजार दिव्यांग मतदार आणि १२ लाख ५ हजार ज्येष्ठ नागरिक मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, विविध राजकीय पक्षांनी आपले तंत्र आणि धोरणे ठरवली आहेत. त्यात प्रस्थापित पक्षांबरोबरच नवउदयोन्मुख पक्षांचा समावेश आहे. त्यामुळे राज्यातील राजकीय समीकरणे आणि मतदारांची भावना यावर मोठा परिणाम होऊ शकतो. यामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदारांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करणे आवश्यक आहे. लोकशाहीत मतदान हे एक मूलभूत अधिकार आहे, ज्याचा उपयोग प्रत्येक मतदाराने करणे अपेक्षित आहे. या निवडणुका केवळ राजकारणाचा खेळ नसून, राज्याच्या भविष्याचा निर्धार करणारा महत्त्वाचा टप्पा आहेत.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका महाराष्ट्राच्या जडणघडणीसाठी आणि राज्य विश्वास पात्र हातात देण्याची महत्त्वाची संधी आहे. ज्यामुळे राज्याची दिशा ठरवली जाईल. सर्व मतदारांनी, विशेषतः तरुणांनी, सक्रियपणे मतदान प्रक्रियेत भाग घेऊन हे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की आपल्या मतांची शक्ती योग्य प्रकारे वापरली जाईल. महाराष्ट्र, एक व्यापक सांस्कृतिक विविधता आणि ऐतिहासिक परंपरा असलेला राज्य आहे. येथील जनतेचा स्वभाव आणि मतदार वर्तन हे अत्यंत समजूतदारपणाचे आहे. महाराष्ट्रातील जनतेची आकांक्षा, त्यांच्या अपेक्षा आणि त्यांच्या दृष्टिकोनातून पाहता, राजकीय पक्षांनी काही महत्त्वाच्या बाबींवर लक्ष केंद्रीत केले पाहिजे.

महाराष्ट्रातील जनतेचा स्वभाव शिस्तप्रिय, मेहनती आणि विचारशील असा आहे. विविधता आणि समावेशकतेमध्ये विश्वास असलेल्या या समाजात, शिक्षणाच्या महत्त्वाबाबत जागरूकता आहे. राजकारणाबाबत जनतेची अस्वस्थता आणि चिंतादेखील स्पष्ट आहे. विकास, रोजगार, महिला सशक्तीकरण आणि शेतकऱ्यांचे कल्याण यासारख्या मुद्यांवर जनतेचा भर आहे.

महाराष्ट्रातील मतदारांचे वर्तन परिपक्व आणि विकसित झाले आहे. लोकांचा राजकारणात सक्रिय सहभाग वाढत आहे, विशेषतः तरुण मतदारांच्या सक्रियतेने राजकारणात एक नवीन चैतन्य निर्माण झालेले आहे. आचारसंहितेचा आदर, पारदर्शकता आणि सत्यता या बाबींचे ज्ञानही त्यांना आहे. अशा परिस्थितीत पक्षांमधील वैयक्तिक कलह, वादविवाद आणि आरोप-प्रत्यारोप यामुळे मतदारांचा विश्वास कमी होऊ शकतो.

राजकीय पक्षांनी सामाजिक समर्पणाचे दर्शन घडविणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न, कामगारांचे हक्क, महिला सशक्तीकरण यांवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. पक्षांनी त्यांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता ठेवली पाहिजे. मतदारांना त्यांच्या निर्णयांबद्दल माहिती दिली पाहिजे, ज्यामुळे विश्वास निर्माण होईल. डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर करून युवा मतदारांपर्यंत पोहोचणे महत्त्वाचे आहे. समाजमाध्यमांचा उपयोग करून प्रत्येक पक्षांना विचारविनिमय साधावा लागणार आहे. विविध समुदायांना व त्यांच्या समस्यांना समजून घेणे आणि त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे. त्यामुळे स्थानिक मुद्दे आणि चिंतेला प्राधान्य देणे शक्य होईल. नवीन विचार, तंत्रे आणि उपाययोजना स्वीकारण्याची तयारी असावी. स्थायी विकासाच्या दृष्टिकोनातून अधिक काम करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील मतदारांचे वर्तन आणि जनतेचा स्वभाव हे समजून घेतल्यास, राजकीय पक्षांना त्यांची धोरणे अधिक प्रभावी बनवता येतील. लोकशाहीमध्ये जनतेचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा असतो आणि त्यांना हवे असलेले परिवर्तन साध्य करण्यासाठी पक्षांनी योग्य दिशेत काम करणे आवश्यक आहे. यामुळे एक अधिक सक्षम आणि समृद्ध महाराष्ट्र निर्माण होईल. महाराष्ट्र एक सांस्कृतिक आणि आर्थिकदृष्ट्या संपन्न राज्य, आपल्या लोकशाही प्रक्रियेत जनतेच्या सहभागाला अत्यंत महत्त्व देते. आगामी विधानसभा निवडणुकीत, जनतेची भूमिका अधिक प्रभावी आणि सक्रिय असली पाहिजे. निवडणूक हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार आहे. जनतेने मतदानाच्या प्रक्रियेबद्दल जागरूक राहणे आवश्यक आहे. त्यांना त्यांच्या मताधिकाराची किंमत कळली पाहिजे, त्यामुळे त्यांची उपस्थिती मतदान केंद्रांवर सुनिश्चित होईल. मतदानाची तारीख, उमेदवारांची माहिती आणि मतदानाच्या पद्धती याबद्दलची माहिती घेणे आवश्यक आहे. राजकीय उमेदवारांची योग्य निवड करणे हे मतदारांचे प्रमुख कर्तव्य आहे. उमेदवारांच्या कार्यकाळातील कामगिरी, त्यांच्या धोरणांचे प्रभाव आणि स्थानिक समस्यांवर त्यांच्या दृष्टिकोनाचा विचार करूनच त्यांना निवडावे. विश्वासार्हता, पारदर्शकता आणि विकासाचे वचन देणारे उमेदवार अधिक महत्त्वाचे आहेत.

महाराष्ट्रात विविध सामाजिक मुद्दे आहेत- शेतकऱ्यांचे प्रश्न, बेरोजगारी, शिक्षण, आरोग्यसेवा, महिला सशक्तीकरण इत्यादी. जनतेने या मुद्यांवर चर्चा करणे आवश्यक आहे आणि त्याबाबतच्या उमेदवारांच्या धोरणांची माहिती घेणे महत्त्वाचे आहे. निवडणुकीत प्रगतीशील आणि स्थायी विकासासाठी आवश्यक असलेल्या मुद्यांवर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. जनतेने फक्त मतदानानेच थांबू नये, तर राजकारणात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. स्थानिक सभा, चर्चासत्रे आणि विविध मंचांमध्ये भाग घेऊन त्यांनी आपल्या समस्या आणि अपेक्षा व्यक्त कराव्यात. यामुळे राजकारणी लोकप्रतिनिधींवर जबाबदारी येईल. राजकारण्यांशी संवाद साधणे, त्यांच्या धोरणांचा खुलासा करणे आणि त्यांच्यावर दबाव आणणे हे जनतेचे कर्तव्य आहे. सामाजिक माध्यमांचा वापर करून जनतेने त्यांच्या विचारांची आणि चिंतेची माहिती पोहोचवणे आवश्यक आहे. यामुळे एक सक्रिय मतदारसंघ तयार होईल. निवडणुकांच्या काळात, जनतेने सकारात्मक दृष्टिकोन ठेवला पाहिजे. भूतकाळातील चुका, नकारात्मकता आणि वादांचा मागोवा घेणे महत्त्वाचे असले तरी, भविष्याच्या दिशेने एकत्रितपणे चालणे अधिक आवश्यक आहे. समाजातील परिवर्तनासाठी सकारात्मक विचारांची गरज आहे.

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत जनतेची भूमिका ही फक्त मतदानावर थांबू नये, तर एक सशक्त आणि सक्रिय मतदार म्हणून आपण आपल्या हक्कांचा उपयोग करावा. मतदानाची जागरूकता, योग्य उमेदवारांची निवड, सामाजिक मुद्यांवर लक्ष केंद्रीत करणे आणि सक्रिय सहभाग यामुळे राज्याच्या भविष्याला दिशा मिळेल. लोकशाहीत जनतेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते, आणि त्यांना हवे असलेले शासन आणण्यासाठी जनतेने एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

## वास्तव

# नैसर्गिक संसाधनांचे विवेकाने उपयोग करणे गरजेचे !



विकास परसराम मेश्राम
7875592800

जग सतत विकसित होत असून हा विकास अनेकप्रकारे होत आहे. पण हा विकास अनेक समस्या आणि संकटांना आमंत्रण देत असताना, ह्या समस्या सोडवण्यात महत्त्वाची भूमिका कुणीही न बजावता बघ्यांची भूमिका घेत आहेत. वर्ल्ड वाइल्डलाइफ फंड फॉर नेचरच्या मते, संसाधनांची मागणी निसर्गाच्या क्षमतेपेक्षा जास्त आहे. जगातील बहुराष्ट्रीय कंपन्या आणि बाजारपेठेतील शक्ती वाढल्याने नैसर्गिक संसाधनांचा अधिक वापर करण्याकडे कल वाढला आहे. नैसर्गिक संसाधनांच्या अतिशोषणामुळे नवीन समस्या निर्माण होत आहेत. त्याचवेळी, जागतिक पर्यावरणीय संकट निर्माण होत आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या शोषणामुळे, हवामान आणि ऋतुचक्रात होणारे झपाट्याने बदल हे सूचित करतात की निसर्गाशी छेडछाड करणे मानवांसाठी एक मोठी आपत्ती ठरू शकते. हिमनद्या वितळणे, त्सुनामी, बर्फाचे वादळे, दुष्काळ आणि अवकाळी पाऊस ही समस्येची स्पष्ट चिन्हे आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या बदल्यात कोणता पर्याय वापरला जाईल आणि नैसर्गिक बदलांचे परिणाम कोणते थांबवू शकतील याविषयी गेल्या तीन दशकांपासून शास्त्रज्ञ चिंतेत आहेत. संयुक्त राष्ट्र विशेषतः नैसर्गिक संसाधनांच्या वाढत्या अंदाधुंद शोषणाबद्दल चिंतित आहे. कोळसा कमाल नव्वद वर्षे, पेट्रोलियम पन्नास वर्षे, पाणी पन्नास वर्षे आणि खनिज साठा पन्नास वर्षे. त्यापेक्षा जास्त काळ टिकणार नाही. पाण्याच्या भीषण समस्येमुळे भविष्यात जलयुद्ध भडकू शकते. विशेषतः पश्चिम आशियामध्ये जेथे पाण्याचा अपव्यय सर्वाधिक आहे. सर्वप्रथम, नैसर्गिक समृद्धीच्या दृष्टिकोनातून भारत हा सर्वात श्रीमंत देश आहे. नैसर्गिक संसाधनांच्या शोषणामुळे अनेक समस्या आणि संकटे निर्माण होतात. पण जनजागृतीचे प्रयत्न सुरू असतानाही लोक जागरूक झाले नाहीत.

पाण्याच्या अशा अपव्ययामुळे देशातील हजारो शेतात आणि शहरांमध्ये पाण्याचे संकट निर्माण झाले असून, अनेक भागात पावसाळ्याचे बाराही महिने दुष्काळसदृश परिस्थिती कायम असते. दुष्काळामुळे पाण्याव्यतिरिक्त धान्य आयात करण्यात आले. परंतु अन्नाच्या समस्येचे कारण उत्पादनाचा अभाव नसून पुरेसा साठवणीचा अभाव आहे. देशात हजारो एकर जमीन नापिक पडून आहे. त्यात सुधारणा करून तेलबिया आणि कडधान्यांचा प्रश्न सुटू शकतो. तेलबिया आणि बाजरीचे उत्पादन वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अनेक योजना सुरू केल्या आहेत, परंतु त्या योजनांनंतरही फारसा बदल दिसून येत नाही. दरवर्षी येणाऱ्या पुरस्थितीमुळे बिहार, आसाम आणि अनेक ईशान्येकडील राज्यांमध्ये, व्यवस्थापनाच्या अभावामुळे, लोकांचे जीवित आणि मालमत्तेचे नुकसान होते. आणि पुरामुळे सुपिक मातीचा थर हा नद्यांमधून समुद्रापर्यंत पोहोचतो व त्यामुळे कृषी उत्पादनावर मोठा परिणाम होत आहे, त्यासाठी पाण्याचे योग्य नियोजन व्यवस्था केल्यास शुद्ध पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर होऊन शेती व दैनंदिन जीवनातील सर्व गरजा पूर्ण होतील.

जागतिकीकरणानंतर केंद्र आणि राज्य सरकारांनी उदारीकरण आणि खासगीकरणाच्या नावाखाली बहुराष्ट्रीय कंपन्यांना नैसर्गिक साधनसंपत्तीचे शोषण करण्यास मोकळे रान दिले. त्यामुळे देशातील अनेक नैसर्गिक संसाधने संपली आहेत व संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहेत. याशिवाय मौल्यवान खनिजे, जंगले, खाणी आणि अनेक रासायनिक वस्तूंच्या शोषणामुळे पर्यावरणासह अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. नैसर्गिक साधनसंपत्तीच्या संतुलित वापराबाबत सर्वसामान्यांमध्ये संवेदनशीलता निर्माण करणे प्रभावी ठरू शकते. केंद्र, राज्य सरकार आणि स्वयंसेवी संस्था यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. जलस्रोत, बागा, जंगले, तलाव आणि इतर नैसर्गिक संसाधने सतत नष्ट होत आहेत. पाश्चिमात्य जीवनशैलीचे आंधळे अनुकरण टाळून निःस्वार्थीपणे भारतीय संस्कृती अंगीकारली पाहिजे, न्याय्य वापर, सर्वांचा विकास आणि निसर्ग ही विचारधारा सर्वांपर्यंत पोहोचली आहे. पण संपूर्ण समस्या संघटनात्मक ज्ञानाच्या अभावामुळे आहे. चांगल्या जीवनासाठी कोणत्या गोष्टींची गरज आहे, किती, कोणत्या स्वरूपात आणि केव्हा आणि कोणत्या पद्धतीने आणि किती प्रमाणात वापरायला हवा, याचा विचार करण्याची गरज असून नैसर्गिक संसाधनांचा विवेकाने वापर हा पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी आणि आपल्या भविष्याची सुरक्षा करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. शाश्वत विकासाच्या तत्त्वांचा अवलंब, पर्यावरणपूरक तंत्रज्ञानाचा वापर, आणि संसाधनांचे पुनर्चक्रीकरण हे यासाठी आवश्यक आहे. तसेच, समाजाच्या प्रत्येक घटकाने या प्रक्रियेत सहभागी होऊन पर्यावरण संरक्षणासाठी योगदान द्यावे. यामुळे आपण आपल्या भविष्याला एक सुरक्षित आणि शाश्वत दिशा देऊ शकतो.

मु.पो. झरपडा ता. अर्जूनी/मोर, जि. गोंदिया
vikasmeshram04@gmail.com

## मनाचिये गुंती

# चांगले दिवस येण्यासाठी...



वैशाली पाटील
9420350171

आजचा विषय नेहमीपेक्षा वेगळा आहे... पण अत्यंत महत्वाचा आहे. आता सगळीकडे विधानसभा निवडणुकीचा बिगूल वाजलाय. प्रत्येक तालुक्यात राजकीय वारे जोरात वाहू लागले आहेत. आता प्रत्येक पक्ष आणि नेता आपापल्या परीने स्वतःचे सामर्थ्य आणि कर्तृत्व समोर आणतील. पण नागरिकांनी सारासार विचार करून मतदान नक्की करावं, असं माझं मत आहे. पण आपण नेमके करतो ते उलट.

लोकशाही शासन व्यवस्थेत लोकांना हवे ते दिले तरच तो पक्ष अथवा नेता सत्ताधारी होऊ शकतो. म्हणून तो पक्ष किंवा नेता लोकांना जे हवे ते ते देऊ पाहतो.. पण आपण मागतो तरी काय बघा... आम्हाला हवे नेत्यांचे पुतळे-स्मारके, आरक्षण.. मोफत योजना...! काही लोकं तर पैसे, बिर्याणी, बाटली, मोफत तीर्थक्षेत्र प्रवास, समाज मंदिरासाठी देणगी, क्रिकेटसाठी देणगी यावरच मतदान करतात. आपल्याला कर्ज माफ करणारे सरकार हवे, आपल्याला वीज बिल माफ करणारे सरकार हवे. ढोबळ विचार केला तरी लक्षात येईल की राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यात ठोस आश्वासने असतात तरी का? नाहीच हो.. जाहीरनाम्यात असते फक्त नेत्यांची स्मारके-पुतळे बांधू, अमूक जातीला आरक्षण देऊ, अमुक मोफत देऊ, तमुक मोफत देऊ, गरिबी हटवू... चूक त्यांची नाही.. झुकती है दुनिया तो वो झुकायेंगे...आपण या अल्पशिक्षित, गुन्हेगार पार्श्वभूमीच्या आणि शिक्षण सम्राट मंडळींना निवडून देतो. आणि डोळे बंद करून बसतो...

आपण कधी समाज माध्यमांवर शाळा, दवाखाने, न्यायालय याबद्दल कधी चर्चा करतो का? वाईट रस्ते, सार्वजनिक वाहतूक, विजेची व्यवस्था, पाणीपुरवठा अशा गोष्टींच्या सुधारणांबद्दल आपण आग्रही असतो का? त्याबद्दलच्या आपल्या भावना आपल्या आवडत्या पक्ष आणि नेत्यांपर्यंत आपण पोहोचवतो का? त्यासाठी मोर्चा आंदोलने करतो का? हे सगळे केले तरच राजकीय पक्ष आणि नेत्यांना या गोष्टीची दखल नक्कीच घ्यावी लागेल. आपण आपल्या मतदारांचीही काही कर्तव्ये आहेत ते मात्र आपण सोयीस्करपणे विसरतो.

लोकांना तात्काळ खुश करणाऱ्या फुकट्या योजना आणि जातीवर आधारित राजकारण या दोन बाबी निवडणुकीतील विजयाला मुख्यतः कारण ठरत आहेत. आपण याकडे दुर्लक्ष केले पाहिजे. नशा आणणारे धर्माचे राजकारण जोडीला आहेच.. खरे तर बेरोजगारी, महागाई, सामाजिक-राजकीय - आर्थिक धोरणे या बाबींनी निवडणुकीवर अधिक प्रभाव टाकला पाहिजे.

आपले शाश्वत आणि दीर्घकालीन हित कशात आहे, हे आपण लक्षात घेतले पाहिजे. महिलांसाठी, वयस्क लोकांसाठी अनेक प्रलोभने समोर येत आहेत, मात्र त्याची सुरक्षितता मात्र ऐरणीवरच आहे..

शेतमालाला किफायतशीर भाव नाहीय, त्यात भर निसर्ग त्यांच्या मालावर आघात करीत आहे.. शेतकऱ्यांकडे अधिक पैसे येतील यावर विचार केला जातोय का? खरं तर राजकीय नेत्यांच्या तात्त्विक मांडणीतून उद्भुत झालेल्या चळवळी अधिक परिणामकारक ठरू शकतात. त्यातून साध्य झालेले परिवर्तन तुलनात्मकदृष्ट्या स्थायी असण्याची शक्यता असते.

पण आजकाल नेते लोकमताशी आणि लोकांच्या उत्स्फूर्त भावनांशी सहमत होत नाहीत. आमचा राजकीय पक्ष एका विशिष्ट विचारांवर चालतो... जाती धर्म, फोडाफोडी, आमिषे यावरील कोत्या विचारांच्या राजकीय नेत्यांना आपण संन्यास दिलेलाच बरा....आणि जो नव्या दमाचे नवीन विकास स्वप्ने पूर्ण करील याची खात्री असेल त्या चेहऱ्यांना संधी दिली पाहिजे....! कारण अजून महाराष्ट्राचा विकास खूप बाकी आहे... नाही तर फुटाफुटीला पुढील पाच वर्षांतही ऊत येईल. त्यामुळं चांगले दिवस येण्याची वाट बघत असाल तर काहींना झटका देणे आवश्यकच आहे.. आणि नव्या दमाच्या नव्या राजकीय चेहरे समोर आणणे आपल्याच हातात आहे... जनतेने जागृत अवस्थेत मतदान करावं हीच फक्त अपेक्षा...!

## वाचक विचार मंच

# चारचाकी वाहन (कार)उत्पादनावर मर्यादा हवी!



आपल्या देशात २१-२२ चे सर्वे नुसार दर १२ कुटुंबामागे १ कार होती. आताच्या काळातील सर्वे झाल्यास निश्चितच ६ कुटुंबामागे १ कार आढळू शकते. चारचाकी वाहन हे आजही गरज असो किंवा नसो, प्रतिष्ठेसाठी कार घेण्यासाठी चढाओढ लागली आहे. ज्यांना व्यवसाय, नोकरी साठी कार हवी ते योग्य आहे. वाढत्या कार संख्येने शहरात, ग्रामीण भागात, रस्ते लहान पडत असल्याने वाहतूक कोंडी, अपघात ही नित्याची बाब झाली आहे. एकाच कुटुंबामागे चारचाकी, दुचाकी जवळपास ३ ते ४ हे प्रमाण दिसते आहे. उत्पादक कंपन्या, लोन देणाऱ्या बँका यांचे प्रोत्साहन भरपूर असल्याने प्रचंड प्रमाणात वाहन संख्या वाढत आहे. ही बाब भविष्यात धोकादायक असून शहरात, निम्न शहरी भागात पार्कींग व्यवस्था बिकट होत आहे. आपले देशाचे कमी असलेले क्षेत्रफळ, लोकसंख्या घनता, त्या प्रमाणात रस्ते विस्तृत जाळे नसल्याने याबाबत शासनाने वाहन ऊतपादनावर मर्यादा ठेऊन धोरण आखण्याची वेळ आली आहे.

**सेवकराम लहाने**
मुर्तिजापूर, जि. अकोला
मो. नं ९८६०२४३६१५

## धुमस

# धार आज भी तेज है !

मावशी म्हणाली चल पेंढ्या
आता पटकन निघ
सिल्व्हर ओकपुढे इच्छूकांची
लागली आहे रीघ

पेंढ्या म्हणे विजयाचा
दावा कसा करते थेट?
मावशी म्हणे मागच्या वेळचा
बघ त्यांचा स्ट्राईक रेट

मनात नको शंका
काकांचाच वाजतोय डंका
जो तो म्हणतो तुतारी फुंका
अन् हमखास जिंका

औरों को तो कोई पुछता भी नहीं
मगर इनकी आज भी क्रेज है
तलवार पुरानी है तो क्या हुआ
धार आज भी तेज है

म्हणूया वाट चुकलो होतो
आता चुका घाला उदरात
तिकीटाचे दान तुम्ही
घाला माझ्या पदरात

**ॲड. अनंत खेळकर**
**अकोला**

## प्रासंगिक

# पोलिस हुतात्मा दिन!

आज २१ ऑक्टोबर, आजचा दिवस संपूर्ण देशात पोलीस हुतात्मा दिन म्हणून पाळला जातो. अखंड देशासाठी त्यागाची भावना ठेवून कर्तव्यावर असलेले अनेक पोलीस जवान शहीद होतात त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस पाळण्यात येतो.

२१ ऑक्टोबर १९५९ रोजी पोलीस दलातील १० पोलीस शिपाई लडाख हद्दीत भारत-तिबेट सीमेवर व दोन हजार पाचशे हॉट ग्रीन या सीमेवर निर्जन बर्फाच्छादित प्रदेशात कडाक्याच्या थंडीत गस्त घालत असताना धोकादायक पद्धतीने दबा धरून बसलेल्या चिनी सैनिकांच्या हल्ल्यात शहीद झाले. या दिवसाची आठवण राहावी तसेच देशामध्ये दहशतवादी हल्ल्यात, नक्षलवादी कारवाईत, समाज कंटक व हिंसक कृत्य करणाऱ्यांकडून कर्तव्यावर असताना शहीद झालेल्या जवानांच्या स्मृतीला या दिवशी उजाळा दिला जातो. २४ तास ऑन ड्युटी असे पोलिसांचे वर्णन केले जाते. कारण जनतेच्या सेवेसाठी ते २४ तास तयार असतात.. मोर्चे, आंदोलने, निवडणुका पोलिसांशिवाय पार पडूच शकत नाही. मोर्चे, आंदोलने, निवडणुकीसाठी कायम पोलीस बंदोबस्त तैनात असतो. कोणतीही आपत्ती येऊ मग ती निसर्गनिर्मित असो की मानवनिर्मित जनतेच्या रक्षणासाठी सर्वात प्रथम पोलिसच हजर असतात. पोलिस जनतेच्या सुरक्षेसाठी काय करू शकतात हे मुंबईवर झालेल्या २६/११ च्या पाक पुरस्कृत दहशतवादी हल्ल्यात जगाने पाहिले आहे. केवळ पोलिसांच्या धाडसामुळे मुंबईवर हल्ला करण्याचा दहशतवाद्यांचा डाव त्यांच्यावरच उलटला. प्राणाची बाजी लावून पोलिसांनी मुंबई वाचवली. या हल्ल्यात अनेक पोलीस शहीद झाले. स्वतःच्या प्राणांची आहुती देऊन पोलिसांनी मुंबईकरांचा जीव वाचवला. कोरोनाने हजारो पोलिसांचा बळी घेतला तरीही पोलीस आपल्या कर्तव्यापासून तसूभरही हलले नाहीत. पंतप्रधानांनी त्यांना त्यांच्या या कार्यासाठी कोव्हिड योद्धा ही उपाधी दिली होती. पंतप्रधानांनी पोलिसांना दिलेली कोव्हीड योद्धा ही उपाधी सर्वार्थाने योग्य होती. देशातील कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी आपल्या कुटुंबाची पर्वा न करता बारा ते अठरा तास प्रसंगी सुट्टी न घेता कर्तव्यावर राहून मातृभूमीचे रक्षण करण्यासाठी अनेक पोलीस जवान शहीद होतात. दहशतवादी, नक्षलवादी यासारख्या देशविघातक शक्तींविरुद्ध लढताना काहींना वीरमरण येते. अशा शहीद जवानांचे स्मरण करून त्यांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करणे हे देशातील प्रत्येक नागरिकांचे कर्तव्यच आहे. या दिवशी सरकारच्या वतीने पोलीस हुतात्मा स्मारकास पुष्पचक्र अर्पण करून शहीद पोलीस जवानांना मानवंदना दिली जाते. हा दिवस देशातील सर्व पोलीस जवान, अधिकारी, कर्मचारी यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा व पवित्र आहे. पोलिस हुतात्मा दिनानिमित्त शहीद पोलीस जवानांना विनम्र अभिवादन

**श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे, मो.नं. ९९२२५४६२९५

## गुल्लेर

# मारली चाट



नरेंद्र इंगळे
9561226572

'ओ आजी, तुह्या नाताले आवर.. तो धाऊधाऊ स्टॅंडवरच जाते एसटी पाहाले.'

'त्याचं काही चुकलं नाही.. तो एसटीतच झाला.'

'म्हनजे?'

'त्याची माय एसटीत बसली.. रस्त्यानंच तिचं पोट दुखाले लागलं.. एसटीत झटके बसले अन् हे कार्टं पैदा झालं.'

'म्हनून एसटीची नवाई आहे वाटते त्याले.'

'एक वर्षाचं होतं ताहाच एसटीचा आवाज काढे. आता ते पाच वर्षाचं झालं. पाच वाजता एसटी गावात येते. हे पोरगं चार वाजताच जाऊन बसते. रस्त्यानं एसटी चालवत घरी पयत येते.'

'अरे लेक!'

'चारपाच लहान लेकरं जमा करते अन् त्याहिले म्हनते बसा एसटीत.. काढा तिकिट.. डबल घंटी मारते.. आला देवरी फाटा.. उतरा खाली.. देवाजवळची घंटी वाजवते.'

'एसटीत झाला म्हनून असर पडला त्याच्यावर.'

'रात्री मुकं बसत नाही. झोपीत वसनावते.. आली अमरावती.. उतरा खाली.'

'मोठा झाल्यावर कंडक्टर होते काय लेक?'

'काय सांगाव? कोन्या जत्रीत गेला की जत्रीत एसटी इकत घेते. सात आठ एसट्या जमा झाल्या.. एसटीले दोरी बांधून फिरोत राह्यते. मले म्हनते बुडगे, बाजुले सरक.. एसटी आंगाऊन जाईन.'

'एसटीत बसला नाही काय गळी आजून?

'एसटीत बसाचा लय हरीक आहे त्याले. कोनी पावना आला की त्याच्या मागं लागते. एकडाव हे पोट्टं एकटंच बसून गेलं होतं एसटीत.'

'कसं काय गेलं?'

'फाट्यावर एसटी थांबली. हे पोरगं अंदर घुसलं. लेकरु असल्यानं कंडक्टरनं तिकीट विचारलं नाही. हे पोरगं आकोल्यात गेलं. तथून नागपूरच्या गाडीत बसलं. दूर गेल्यावर कंडक्टरनं नावगाव विचारलं. एका हॉटेलवाल्याच्या ताब्यात देलं. तथून फोन आला. मंग त्याचा बाप आनाले गेला.'

'त्याच्यावर ध्यान ठेवत जाय.. या पोराचा काही नेम नाही.'

'कितीक ध्यान ठेवाव? बातच चाट देते.'

'अरे हो लेक! आताच्या आता कुठी गेला? म्या हात धरून आनला होता.'

'गेला वाटते एसटी पाहाले.'

# एअर इंडियाने प्रवास करू नका - गुरपतवंतसिंग पन्नू

देशोन्नती वृत्तसंकलन



**नवी दिल्लीः** खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंतसिंग पन्नू याने आज प्रवाशांना १ ते १९ नोव्हेंबरदरम्यान एअर इंडियाच्या फ्लाइटमध्ये प्रवास न करण्याची धमकी दिली. शीख हत्याकांडाच्या ४० व्या वर्धापनदिनानिमित्त एअर इंडियाच्या विमानावर हल्ला होऊ शकतो, असा दावा त्यांनी केला. शीख फॉर जस्टिसचे (एइव) संस्थापक गुरपतवंतसिंग पन्नू यांनी गेल्या वर्षी अशीच धमकी दिली होती. पन्नूची ही ताजी धमकी अशा वेळी आली आहे जेव्हा भारतीय विमानांना सातत्याने बॉम्बच्या धमक्या येत आहेत. मात्र, आतापर्यंत या धमक्या केवळ अफवा असल्याचे सिद्ध झाले आहे. जुलै २०२० पासून गृह मंत्रालयाने पन्नू याला देशद्रोह आणि फुटीरतावादाच्या आरोपाखाली दहशतवादी घोषित केले आहे. वेगळ्या शीख राज्याचा पुरस्कार करणाऱ्या एसएफजेचे ते नेतृत्व करतात.



**पुणे :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील खरेदी- विक्रीवर आकारण्यात येणारे बाजार शुल्क (सेस) नको, अशी भूमिका राज्यभरातील व्यापाऱ्यांनी घेतली आहे. बाजार आवारात आकारण्यात येणाऱ्या सेसला व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे.

# युएईत विवाहासाठी प्रीमॅरिटल जेनेटिक टेस्टिंग अनिवार्य

वृत्तसंस्था

**युएई :** संयुक्त अरब अमिरातच्या (युएई) सरकारने आरोग्यावरून मोठा निर्णय घेतला आहे. तेथील आरोग्य विभागाने 'प्रीमॅरिटल जेनेटिक टेस्टिंगला अनिवार्य पेले आहे. या नियमाच्या अंतर्गत युएईमध्ये विवाह करण्यापूर्वी जोडप्याला जेनेटिक टेस्टिंग करविणे अनिवार्य असेल. आगामी पिढ्यांच्या हिताकरता हा निर्णय घेण्यात आला आहे.

आईवडिलांच्या जेनेटिक आरोग्याबद्दल कळावे आणि कुठलाही जेनेटिक डिसऑर्डर मुलांना होऊ नये याकरता हा निर्णय घेण्यात आला आहे. पालकांकडून खास डीएनए सीक्वेंसिंग किंवा क्रोमोजोम्सची संरचना अपत्यांना मिळते. यात असलेल्या जीनद्वारे आमचा रंग, रूप, रचना, सवयी आणि वर्तन कसे असेल हे निश्चित होते. हे सर्वकाही जीनचे एक्स्प्रेशन असते. जर यात काही



डिफेक्ट किंवा म्युटेशन झाले तर आगामी पिढ्यांनाही ते पास ऑन होते. यामुळे मुलांना अनेक प्रकारचे आजार किंवा समस्या होऊ शकतात. बहुतांश प्रकरणांमध्ये तर यावर कुठलाच उपचार नसतो आणि शिशूचा मृत्यू होत असतो. जेनेटिक आजार आरोग्य व्यवस्थेसाठी दीर्घकाळापासून आव्हान ठरले आहेत. या आजारांवरील वैज्ञानिक संशोधन वाढल्यावर जेनेटिक आजार रोखता येणे शक्य असल्याचे निदर्शनास आले आहे.



## 'लवकर कायदा आणणार' नागरी विमान वाहतूक मंत्र्यांचे संकेत

# बॉम्बची धमकी देणे महागात पडणार

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** 'अलीकडेच अनेक देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांवर खोट्या बॉम्ब कॉलने सर्वत्र खळबळ उडाली होती. याच धमक्यांचा फोनवर आता नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू किंजरापू यांनी प्रतिक्रिया दिली आहे. नागरी विमान वाहतूक मंत्रालयाच्या वतीने आम्ही गरज पडल्यास काही कायदेशीर कारवाईचा विचार केला आहे, अशी माहिती राममोहन नायडू यांनी दिली. राममोहन नायडू यांनी या सर्व घटनांवर बोलताना म्हणालेत, अशी प्रकरणे रोखण्यासाठी आम्ही दोन गोष्टींवर काम करू शकतो या निष्कर्षाप्रत आम्ही पोहोचलो आहोत. पहिली म्हणजे विमान सुरक्षा नियमांमध्ये सुधारणा. हे नियम बदलून, आम्ही अशी तरतूद करू की एकदा कोणी असे करताना पकडले की आम्ही त्याला नो-फ्लाइंग यादीत टाकू. याशिवाय, दुसरी गोष्ट म्हणजे नागरी विमान वाहतूक सुरक्षा कायद्याच्या विरोधात बेकायदेशीर कायद्यांचे दडपण बदलले पाहिजे असे त्यांनी म्हटले. अशा धमक्यांमुळे प्रवाशांचा वेळ वाया जातो आणि भीतीचे वातावरण निर्माण होते, तर दुसरीकडे विमान कंपन्यांचा खर्चही वाढतो, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

## फेक कॉलमुळे विमान वाहतुकीला फटका

हे संवेदनशील परिस्थिती असल्याचे वर्णन करताना राममोहन नायडू म्हणाले की, असे खोटे कॉल करणाऱ्यांना एअरलाइन्स कंपनीच्या नो-फ्लाय लिस्टमध्ये टाकले जाईल. या मुद्यावर आम्ही अनेक बैठका घेतल्या आणि अखेर त्यावर काम करण्याचा निर्णय घेतला. उड्डाणांवर बॉम्बच्या खोट्या धमक्यांमुळे विमान उद्योगासाठी नवीन आर्थिक समस्या निर्माण होत आहेत, असेही ते म्हणाले. विमानात बॉम्ब असणे किंवा ते बॉम्बने उडवून देण्याची धमकी देण्याच्या घटना गेल्या काही महिन्यांत झपाट्याने वाढल्या आहेत. जर आपण फक्त गेल्या ६ दिवसांबद्दल बोललो तर, भारतात देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांमध्ये बॉम्बबद्दल सुमारे ७० बनावट कॉल आले आहेत.

# जास्त मुले असलेल्यांना निवडणूक लढवता येणार

देशोन्नती वृत्तसंकलन

**आंध्रप्रदेश :** लोकसंख्येच्या बाबतीत भारत पहिल्या क्रमांकावर आला आहे. देशातील लोकसंख्येवर नियंत्रण आणण्यासाठी जनसंख्या नियंत्रण धोरणाचा अवलंबन केला जात होता. मात्र, सध्या देशात वाढत जाणाऱ्या वृद्धांची संख्या आणि कमी होत चाललेल्या युवकांच्या संख्येमुळे चिंता व्यक्त केली जात आहे. राज्यात युवकांची संख्या वाढवण्यासाठी दोनपेक्षा अधिक मुले असलेल्या परिवाराला प्रोत्साहन दिले जाणार आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू यांनी नवीन लोकसंख्या धोरण आणण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन कायद्यानुसार दोनपेक्षा जास्त मुले असलेल्यांना निवडणूक

**चंद्राबाबू नायडू यांनी दिली माहिती**



लढवता येणार असल्याचे चंद्राबाबू नायडू यांनी स्पष्ट केले आहे.

जपान, चीन आणि काही युरोपीय देशांमध्ये ज्येष्ठ नागरिकांची संख्या जास्त आहे, असे चंद्राबाबू यांनी सांगितले. तसेच करियरच्या चांगल्या संधी मिळत असल्यामुळे तरुण तरुणी बाहेरगावी जात आहेत. दक्षिण भारतात हे आव्हान अधिक आहे. आंध्र प्रदेशातील अनेक गावांमध्ये फक्त वृद्ध व्यक्तीच राहत आहेत. युवा पिढी शहरात निघून गेली आहे. दक्षिण भारतातील प्रजनन दर १.६ टक्के खाली आला आहे, तर राष्ट्रीय प्रजनन दर २.१ आहे. जर प्रजनन दरात अशीच घट होत राहिली तर २०४७ पर्यंत वृद्धांची संख्या लक्षणीय होणार आहे, अशी चिंता त्यांनी व्यक्त केली आहे. केंद्राच्या यूथ इन इंडिया २०२२ च्या अहवालामध्ये भारतात वृद्धांची संख्या वाढत असल्याचे नमूद करण्यात आले आहे. तसेच या अहवालानुसार २०३६ पर्यंत देशातील ३४.५५ कोटी लोकसंख्या तरुण असणार आहे. ती सध्या ४७ टक्के पेक्षा जास्त आहे. सध्या देशात २५ कोटी तरुण १५ ते २५ वर्षांचे आहे; परंतु पुढील १५ वर्षांत त्यात लक्षणीय घट होणार आहे.

# गोवा क्षय मुक्तीसाठी सहकार्य आवश्यक

## आरोग्य मंत्री विश्वजीत राणेंचे आवाहन

देशोन्नती वृत्तसंकलन

**पणजी :** राज्यात क्षय मुक्तीसाठी आरोग्य खाते प्रयत्न करत आहे. पंचायत स्तरावर क्षयमुक्तीसाठी पंचायतीचे सहकार्य आवश्यक असल्याचे आवाहन आरोग्यमंत्री विश्वजीत राणे यांनी केलेत. आज सोमवारी खात्यातर्फे क्षयमुक्त झालेल्या उसगाव आणि शिरोडा पंचायतींच्या सत्कार समारंभात ते बोलत होते. यावेळी अभिनेत्री वर्षा उसगावकर, तियात्रिस्त जॉन डिसिल्वा, संचालक डॉ. वंदना धुमे, डॉ. रुपा नाईक, श्वेता देसाई आदी उपस्थित होते.



आरोग्यमंत्री राणे यांनी सांगितले की, क्षय मुक्तीसाठी आरोग्य खात्याने जागृती मोहीम सुरू केली आहे. अनेकदा या आजाराकडे दुर्लक्ष केले जाते. माझ्या घरात एका गर्भवती मुलीला क्षय रोग झाला होता.

# भारत - ओमानचा सागरी सराव संपन्न

वृत्तसंस्था

**पणजी :** आयएनएस त्रिकंद आणि सागरी क्षेत्रातील हवाई गस्तीच्या डॉर्निअर विमाने आणि ओमानच्या नौदलाचे अल सीब हे जहाज यांच्या नसीम-अल-बहर हा द्विपक्षीय संयुक्त सराव नुकताच पार पडला. १३ ते १८ ऑक्टोबर या कालावधीत गोवा इथे या सरावाचे आयोजन करण्यात आले होते. हा द्विपक्षीय संयुक्त सराव दोन टप्प्यामध्ये पार पडला.

## संयुक्त सराव दोन टप्प्यात

याअंतर्गत १३ ते १५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीदरम्यान झालेल्या पहिल्या टप्प्यात बंदराच्या ठिकाणी सरावा अंतर्गतचे उपक्रम राबवले गेले, तर या कालावधीत हार्बर टप्पा आणि त्यानंतर सागरी क्षेत्रातील सरावा अंतर्गतचे उपक्रम राबवले गेले.

# बांगलादेशात सर्वोच्च न्यायिक परिषदेची पुनर्स्थापना

देशोन्नती वृत्तसंकलन

## 16 वी घटनादुरुस्तीदेखील सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवला

**ढाका :** बांगलादेशातील सर्वोच्च न्यायालयाने देशातील सर्वोच्च न्यायिक परिषदेची पुनर्स्थापना केली. या परिषदेला न्यायिक गैरवर्तवणुकीचा तपास करण्याचा अधिकार असणार आहे. न्यायाधीशांना पदावरून हटवण्याचा अधिकार संसदेला देणारी १६ वी घटनादुरुस्तीदेखील सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरवली आहे.

देशाचे सरन्यायाधीश सईद रफात अहमद यांच्या नेतृत्वाखाली सहा सदस्यीय अपील विभागीय पीठाने हा निकाल दिला. राज्यघटनेतील पूर्वीच्या तरतुदी सर्वोच्च



न्यायालयाने पुन्हा कायम केल्या आहेत. न्यायाधीशांना हटवण्याचा अधिकार न्यायिक आयोगाकडून काढून संसदेला देण्याची १६ वी घटनादुरुस्ती माजी पंतप्रधान शेख हसिना यांच्या कार्यकाळात, जानेवारी २०१४ मध्ये करण्यात आली होती; परंतु मे २०१६ मध्ये उच्च न्यायालयाच्या तीन सदस्यीय खंडपीठाने ही घटनादुरुस्ती बेकायदेशीर घोषित केली होती. त्या निर्णयाला सरकारने जानेवारी २०१७ मध्ये आव्हान दिले होते. अपील न्यायालयाच्या ७ सदस्यीय पिठाने जानेवारी २०१७ मध्ये उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवला होता. त्यानंतर हसिना सरकारने उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या फेरविचाराची याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती.


# इराण हल्ल्यासंबंधी कागदपत्रे टेलिग्रामवर झळकली

देशोन्नती वृत्तसंकलन

**वॉशिंग्टन :** इस्रायलची गुप्त कागदपत्रे अमेरिकेकडून लीक झाली आहेत. या कागदपत्रांमध्ये इराणवर हल्ला करण्यासंबंधी माहिती समाविष्ट होती. मिडल ईस्ट स्पेक्टेटर नावाच्या चॅनलने शुक्रवार, १८ ऑक्टोबर रोजी काही दस्तावेज टेलिग्रामवर पोस्ट केल्याने खळबळ निर्माण झाली आहे. या कागदपत्रांवर टॉप सीक्रेट आणि १५ आणि १६ ऑक्टोबरची तारीख लिहिली आहे. अशी कागदपत्रे लीक होणे ही अमेरिकेसाठी चिंतेची बाब आहे. याप्रकरणी आता अमेरिकेने चौकशी सुरू केली आहे. ही गुप्त माहिती पेंटागॉनच्या कोणत्या अधिकाऱ्यांकडे होती याची माहिती मिळविली जात आहे.

टेलिग्रामवर लीक झालेले दस्तऐवज फक्त अमेरिका आणि त्याच्या सहयोगी देश ऑस्ट्रेलिया, पॅनडा, न्यूझीलंड आणि ब्रिटनसाठी आहेत. हे सर्व देश फाईव्ह आईज या गुप्तचर नेटवर्कचा भाग आहेत. इराणने १ ऑक्टोबर रोजी इस्रायलवर १८० क्षेपणास्त्रांनी

## मिडल ईस्ट स्पेक्टेटरच्या पोस्टने खळबळ



हल्ला केला होता. यानंतर इस्रायलने प्रत्युत्तर देण्याचा इशारा दिला होता. तसेच आता प्रतिहल्ला करण्याची जोरदार तयारीही चालवली आहे. गुप्त कागदपत्रांनुसार इस्रायल इराणवर मोठा हल्ला करण्याच्या तयारीत आहे. यातील एका कागदपत्रानुसार इस्रायलने हल्ल्यासाठी शस्त्रास्त्रांची वाहतूक सुरू केली आहे. हा दस्तऐवज नॅशनल जिओस्पेशियल इंटेलिजन्स एजन्सीने तयार केला आहे. दुसऱ्या दस्तऐवजात इस्रायली हवाई दलाच्या सरावांशी संबंधित माहिती आहे. त्यात हवेतून जमिनीवर मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या चाचण्यांशी संबंधित माहिती आहे. एकंदर ही माहिती इराणवर हल्ला करण्याच्या तयारीचा एक भाग असल्याचे मानले जात आहे.

# हिजबुल्लाहच्या उपनेत्याचे लेबनॉनमधून पलायन

वृत्तसंस्था

## इराणमध्ये घेतला आश्रय

**बेरूत :** हिजबुल्लाहचे उपनेते आणि संघटनेचे उपमहासचिव नईम कासिम यांनी लेबनॉनमधून पलायन करत इराणमध्ये आश्रय घेतल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. सुमारे एक आठवड्यापूर्वी ते इराणच्या विमानातून लेबनॉनमधून पळून जाण्यात यशस्वी झाले होते. यूएईस्थित एरेम न्यूजने अज्ञात इराणी सूत्रांच्या हवाल्याने हे वृत्त दिले आहे. लेबनॉन आणि सीरियाच्या राज्य भेटीसाठी तेहरानचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी वापरलेल्या विमानातून नईम कासिम यांनी ५ ऑक्टोबर रोजी बेरूत सोडले. हिजबुल्लाहचा नेता हसन नसरल्लाहच्या मृत्यूनंतर नईम कासिमने तीन भाषणे दिली आहेत. पहिले भाषण बेरूतमध्ये रेकॉर्ड करण्यात आले होते, तर दुसरे आणि तिसरे भाषण तेहरानमधून देण्यात आल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

## कुनो राष्ट्रीय उद्यानातील मादी चित्ता गर्भवती

**कुनो :** मध्य प्रदेशातील कुनो राष्ट्रीय अभयारण्यात आणण्यात आलेल्या चित्त्यांबाबत एक गुड न्यूज आली आहे. मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी समाजमाध्यमांवरुन ही बातमी दिली आहे. कुनो येथे आफ्रिकेवरून आणलेल्या चित्त्यांमधील एक मादी चित्ता गर्भवती राहिली आहे.

# पाचशे एनसीसी कॅडेट्स करणार जलप्रवास

## भारतीय नद्या-संस्कृतींची जननी ही संकल्पना

देशोन्नती वृत्तसंकलन

**कानपूर :** पहिल्यांदाच आयोजित होत असलेल्या उपक्रमांतर्गत नॅशनल कॅडेट कोअर प्रजासत्ताक दिन शिबिर २०२५ चा एक प्रमुख कार्यक्रम म्हणून आपल्या पहिल्या नौकानयन मोहिमेवर रवाना होणार आहे. या मोहिमेत एनसीसीच्या नौदल शाखेचे भारतभरातील ५२८ छात्र सहभागी होतील आणि उत्तर



प्रदेश, बिहार आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधून वाहणाऱ्या गंगा आणि हुगळी नदीतून सुमारे १२०० किमी नौकानयन करतील.



**मोझरी :** खंजिरी भजनांच्या माध्यमातून राष्ट्रीयत्वाची भावना जागृत करणारे, विश्वबंधुत्वाचा संदेश देणारे युगपुरुष वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५६ व्या पुण्यतिथी महोत्सवात देश-विदेशातून आलेल्या भाविकांनी आज सोमवार रोजी ठीक ४ वाजून ५८ मिनिटांनी राष्ट्रसंतांना गुरुकुंज मोझरीत मौन श्रद्धांजली अर्पण केली.

## पिकनिकला गेलेल्या तरुणावर बिबट्याचा हल्ला

**शहडोल :** मध्य प्रदेशातील शहडोलमध्ये काही तरुण मोकळ्या मैदानात उभे राहून व्हिडिओ बनवत होते. दरम्यान, बिबट्याला आपल्या दिशेने येताना पाहून सर्वजण पळून जातात. मात्र, यादरम्यान एक तरुण जमिनीवर पडतो आणि बिबट्या त्याला पकडतो. यानंतर त्याचे इतर साथीदार आवाज करतात आणि बिबट्या त्याला सोडून पळून जातो.

# शंभर घरफोड्या करणाऱ्या सुतारला अटक

## कवठे-महांकाळ हद्दीत सापडला

**सांगली :** जुने गोवा येथील फ्लॅट फोडून ३००० रुपयांची चोरी केल्याच्या प्रकरणी जुने गोवा पोलिसांनी आंतरराज्य १०० हून अधिक चोरी प्रकरणात सहभाग असलेला सराईत चोर लोकेश रावसाहेब सुतार (३०, रा. मिरज, जि. सांगली) याच्या मुसक्या आवळल्या. सुतार याने त्याच्या हद्दीतील दोन फ्लॅटमध्ये चोरी केल्याचे समोर आले आहे. संशयित लोकेश सुतार कवठे-महांकाळ पोलीस स्थानकाच्या हद्दीत असल्याचे समोर आले. तेथील पोलिसांच्या मदतीने जुने गोवा पोलिसांनी सुतार याच्या मुसक्या आवळल्या. त्याला गोव्यात आणून अटक केली.

# सणांनिमित्त मध्य रेल्वेची 570 विशेष ट्रेन सेवा

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी मुंबई :** दिवाळी आणि छट पूजा सणांच्या निमित्ताने गर्दी लक्षात घेऊन आरामदायी प्रवास साध्य करण्यासाठी मध्य रेल्वेने आपल्या प्रवाशांसाठी एकूण ५७० विशेष ट्रेन सेवांची घोषणा केली आहे. ८५ विशेष ट्रेन्सची घोषणा करण्यात आली आहे जी या ५७० विशेष ट्रेन सेवा पूर्ण करतील, त्यापैकी ४२ सेवा आधीच पूर्ण केल्या गेल्या आहेत. या

**४२ सेवा आधीच केल्या पूर्ण**



गाड्यांमध्ये वातानुकूलित विशेष, वातानुकूलित, शयनयान आणि जनरल डब्यांच्या मिश्र संयोजन असलेल्या गाड्या आणि अनारक्षित विशेष गाड्यांचा समावेश आहे.

# दिल्ली स्फोटामागे खलिस्तानचा 'स्लीपर सेल'?

देशोन्नती वृत्तसंकलन

**नवी दिल्लीः** राजधानी दिल्लीतील रोहिणी भागातील सीआरपीएफ शाळेजवळ रविवारी स्फोट झाला. या स्फोटात खिडक्यांच्या काचा फुटल्या असून जवळील वाहनांचे नुकसान झाले आहे. दिल्ली पोलीस या प्रकरणाचा सातत्याने तपास करत आहेत. सीआरपीएफ शाळेजवळ झालेल्या बॉम्बस्फोटाबाबत दिल्ली पोलिसांनी स्फोटक कायद्यांतर्गत एफआयआर नोंदवला आहे. बॉम्बस्फोटाचा तपास लवकरच अधिकृतपणे स्पेशल सेलकडे वर्ग करण्यात येणार आहे. दरम्यान, या स्फोटाबाबत एक मोठा अपडेट समोर आला आहे. दिल्लीतील रोहिणी येथे झालेल्या बॉम्बस्फोटाचा तपास यंत्रणा वेगाने करत आहेत.

काश्मीर जिहादशी निगडित आयएसआय संचालित टेलिग्राम चॅनेलने दिल्ली बॉम्बस्फोटात खलिस्तान समर्थकांचा सहभाग असल्याचे संकेत दिले आहेत. मात्र, यामागे पाकिस्तानी इंटेलिजन्स आयएसआयचा हात असून या बॉम्बस्फोटाला खलिस्तानी अँगल जोडून खलिस्तानी अतिरेक्यांना खतपाणी घालण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे जाणकारांचे मत आहे.

## स्लीपर सेल कोण आहेत?

काही टेलिग्राम चॅनेलवर दिल्लीतील स्फोटामागे खलिस्तानी दहशतवादी असल्याचा दावा केला जात आहे, पण हे दहशतवादी (स्लीपर सेल) काय आहेत? वास्तविक, स्लीपर सेल म्हणजे दहशतवाद्यांचे पथक जे सामान्य लोकांमध्ये राहतात आणि अतिरेक्यांच्या सर्वोच्च नेतृत्वाकडून आदेश मिळाल्यावर कारवाई करतात. त्यांना पकडणे खूप कठीण आहे, कारण ते सामान्य लोकांमध्ये सामान्य लोकांसारखे राहतात.

**स्फोटाबाबत मोठी अपडेट**



## जात जनगणनासह महत्त्वपूर्ण विषयांवर चर्चा

**बेंगळूर :** जात जनगणना अहवाल, अंतर्गत आरक्षण, पोटनिवडणूक यासह चालू घडामोडींबाबत चर्चा करण्यासाठी मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी नुकतीच सर्व मंत्र्यांसोबत डिनर पार्टीची बैठक आयोजित केली होती. मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांचे सरकारी निवासस्थान कावेरी येथे मंत्र्यांची बैठक पार पडली असून जात जनगणना अहवालाची अंमलबजावणी आणि अंतर्गत आरक्षण, पोटनिवडणुकीबाबत महत्त्वपूर्ण चर्चा झाल्याचे सांगण्यात येते.

# तुतारीकडील आवक वाढली

**राजेभाऊ फड** हजारो कार्यकर्त्यांचा प्रवेश

परळी/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करणारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. राज्यासह बीड जिल्ह्यात अनेकजण पक्षात प्रवेश करत आहेत. सोमवारी परळी वैजनाथ येथील संपर्क कार्यालयात मतदारसंघातील नागरिकांची मोठी गर्दी दिसून आली. युवक नेते राजेभाऊ फड यांनी संपूर्ण दिवसभर आलेल्या नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन त्यांच्या प्रश्नांचे समाधान केले. तर मालेवाडी, बरकत नगर (मोमीनपुरा) काकर मोहल्ला, नागापूरसह अनेक गावातील आणि शहरातील हजारो युवकांनी त्यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात जाहीर प्रवेश केला. दिवसेंदिवस प्रवेश करणाऱ्या कार्यकर्त्यांची संख्या वाढत असून, पक्षाची मोठी ताकद येथे निर्माण झाली आहे.




राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात दररोज प्रवेशाचा ओघ वाढतच आहे. परळी विधानसभा मतदारसंघातील असंख्य युवक राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वाखाली प्रवेश करत आहेत तर तेवढेचजण पक्षात येण्यास इच्छुक आहेत. मतदारसंघात पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणावर वाढत असून आगामी निवडणुकीत पक्षाची ताकद मतपेटीतून दिसून येईल असा आशावाद कार्यकर्ते बोलून दाखवत आहेत. सोमवारी झालेल्या पक्ष प्रवेशात सक्रिय महिला कार्यकर्त्या हिराताई सलगर, कुषावर्ता ढवाण, अरूणा घोडके, यांच्यासह हजारो युवक आणि युवतींनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला तर काहीजणांची पक्षाचे पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली ज्यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस किसान सेल तालुका उपाध्यक्ष म्हणून फिरोज शेख, शहराध्यक्ष म्हणून विक्रम दादा देशमुख तर ओबीसी सेल शहर उपाध्यक्ष म्हणून श्रीमंत आप्पा तोडकरी यांची निवड करण्यात आली. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष बाबा शिंदे, शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख, युवक तालुकाध्यक्ष शंकर शेजुळ, ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष एच.यू.फड, शहराध्यक्ष अशोक मुंडे, शहर उपाध्यक्ष शेख हसन, महिला आघाडी तालुकाध्यक्ष वर्षा रायभोळे, युवती तालुकाध्यक्ष दीपा सावंत, शहराध्यक्ष अश्विनी सरवदे, मंगलताई सोळंके, अश्विनी सोळंके यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांची उपस्थिती होती.

दरम्यान मालेवाडी येथील बाबासाहेब बालाजी बदने, ज्ञानोबा बदने यांच्या नेतृत्वाखाली सुद्रान बदने, प्रभाकर बदने, सुग्रीव बदने, सुंदर बदने, वैजनाथ बदने, सुनील बदने, सुमित आंधळे, विठ्ठल कातकडे दिगंबर गुट्टे, गोपाळ बदने कोंडीबा गुट्टे, लिंबाजी बदने, ओम घुले, भागवत बदने, दीपक घुले, गणेश फड, गणेश बदने, वशिष्ठ बदने, संतोष बदने, कृष्णा बदने, सोपान आघाव, राजेश बदने, अशोक बदने, लक्ष्मण बदने, पाटलोबा बदने, दत्तू गीते बाळू बदने सचिन बदने,

पान २ वर...

# वंचितकडून शेलार श्रीगोंदाचे उमेदवार

**रणधुमाळी:** काँग्रेसला मोठा धक्का

नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते अहमदनगर जिल्हा परिषद चे माजी उपाध्यक्ष अण्णासाहेब शेलार यांना श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे त्यामुळे काँग्रेसला अहमदनगर जिल्ह्यामध्ये मोठा धक्का बसला आहे



वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड प्रकाश आंबेडकर यांनी वंचित ची पाचवी यादी जाहीर केली त्यामध्ये अ नगर मधून श्रीगोंदा मतदारसंघातून काँग्रेस पक्षाचे वजनदार नेते अण्णासाहेब शेलार यांना उमेदवारी जाहीर केले आहे अण्णासाहेब शेलार हे श्रीगोंदा मतदारसंघात गेल्या ४० वर्षापासून गोरगरीब सर्वसामान्य जनतेचा प्रश्नांसाठी कार्यरत आहेत त्यांनी एक महिन्यापूर्वी कार्यकर्त्यांचा भव्य असा मेळावा घेऊन आता लढायचं असा चंग बांधा होता त्यांनी वंचित बहुजन आघाडी कडून श्रीगोंदा मतदारसंघातून लढण्याचा निर्णय घेतला आहे. अण्णासाहेब शेलार यांनी वंचित चे तिकीट घेतल्याने अहमदनगर जिल्ह्यामध्ये काँग्रेसला हा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे अण्णासाहेब शेलार हे काँग्रेस पक्षाचे वजनदार नेते आहेत श्रीगोंदा मतदार संघामध्ये त्यांना मानणारा फार मोठा वर्ग आहे श्रीगोंदा मतदार संघामध्ये भाजपकडून प्रतिभा पाचपुते वंचित कडून अण्णासाहेब शेलार व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवारा मध्ये लढत होणार आहे.

# अपघात प्रमाण वाढले, गुन्हा दाखल करा!

**आक्रमक:** एचपीएम कंपनी विरोधात रोष

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

एचपीएम कंपनी व महामार्ग प्राधिकरणाचा निष्काळजीपणा व गलथानपणामुळे टोल नाक्यावरील अपघाताच्या प्रमाणात वाढ होत आहे तर अपघाताला जबाबदार असलेल्या एचपीएम कंपनी व महामार्ग प्राधिकरण यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी नागरिकांतून केले जातात आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, केज पासून जवळच असलेल्या डोनगावफाटा येथील टोल नाक्यावर रस्त्यावर टाकलेले मातीचे ढिगारे व सिमेंट काँक्रिटच्या अवशेषांच्या ढिगाऱ्याला धडकून भीषण अपघात झाला. अपघातात कारने दोन-तीन पलट्या खाल्ल्या. सदर अपघातामध्ये एका दोन महिने वयाच्या मुलीचा हात तुटला आहे. तर चालकाच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून, मुलीची आई, पाच वर्षाची मुलगी, आजी, मुलीचा चुलता हे गाडीतील सहाजण जखमी झाले आहेत. तसेच त्याच ठिकाणी टोल नाक्याच्या



दुसऱ्या बाजूला याच अपघातात नंतर पंधरा ते वीस मिनिटाच्या फरकाने दुसराही अपघात झाला. त्यामध्ये चालक जखमी झाला असून या टोल नाक्याचे काम सुरू असताना रस्ता सुरक्षा किंवा रहदारी बाबत कोणतीही सूचना

पान २ वर...

# लोणार येथे फिरते वस्तुसंग्रहालयाचे उदघाटन

**साहेबराव पाटोळे :** पर्यटकांनी लाभ घेण्याचे आवाहन

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

रोजीछत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, पूर्वी 'द प्रीन्स ऑफ व्हेल्स म्युझियम ऑफ व्हेसटर्न इंडिया' यांनी जगप्रसिध्द लोणार येथे फिरत्या व्हॅनचा लोणार शहरातील नागरींकासाठी व पर्यंटकासाठी उपलब्ध करूंन दिले धार परिसरत या फिरत्या व्हॅनचाउद्घाटन काँग्रेस पक्षाचे माजी जिल्हा सरचिटणीस साहेबराव पाटोळे यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी प्रामुख्याने माजी उपनगराध्यक्ष बादशाह खान, बुलढाणा जिल्हा काँग्रेस ओबीसी सेल जिल्हा अध्यक्ष प्राध्यापक गजानन खरात,लोणार शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद, युवक काँग्रेस शहर अध्यक्ष विकास मोरे, उपस्थित




होते यावेळी पाटोळे यांनी फिरत्या व्हॅनचा रीतसर उद्घाटन केले व लोणार वाशीयांना आव्हान केले की जास्तीत जास्त पर्यटकांनी व गावकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी या वस्तुसंग्रहालयाचे मोठ्या प्रकारे लाभ घ्यावाछत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, पूर्वी 'द प्रीन्स ऑफ व्हेल्स म्युझियम ऑफ व्हेसटर्न इंडिया' नावाने ओळखल्या जाणारे वस्तुसंग्रहालय, हे देशातील एक प्रमुख कला व ऐतिहासिक वस्तुसंग्रहालय आहे. बॉम्बे प्रेसिडेन्सीचे, १९०९ मधील बॉम्बे लेजिस्लेशन क्टच्या आधारावर हे विनाफायदा तत्त्वावरील चालणारे वस्तुसंग्रहालय स्थापित झाले.

ह्या क्टचे नाव प्रीन्स ऑफ व्हेल्स म्युझियम क्ट असे होते (आत्ताचे छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय क्ट)हे स्वयत्त वस्तुसंग्रहालय सरकार कडून विनाअनुदानित असून, ह्याला सार्वजनिक खाजगी सहयोगाचा पाठिंबा आहे. मुंबईच्या दक्षिण टोकावरील अर्धचंद्राकृती जागेवर वसलेली या संग्रहालयाची इमारत ही इंडो- सारसेनिक स्थापत्य शैलीचे उत्तम उदाहरण आहे. आज,

पान २ वर...

# गेवराई पंचायत समिती चर्चेत

**प्रशासन:** गणेश बाजोगदंड यांचा बोलबाला

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी



गेवराई पंचायत समिती नेहमी कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असते. पंचायत समितीच्या तत्कालीन गटविकास अधिकारी मीना कांबळे यांनी रजेवर जाताच त्यांच्या जागी अशोक राठोड यांची नियुक्ती करण्यात आली. पंचायत समितीतील नरेगा सहाय्यक कार्यक्रम अधिकारी म्हणून गणेश जोगदंड हे काम पाहत असून गेल्या अनेक दिवसापासून पंचायत समितीच्या कारभारामध्ये त्यांचे नाव चर्चेत आहे. कुठलाही लाभार्थी काम घेऊन गेला तो रिकाम्या हाती परत न येता त्याचे काम करण्याची हातोटी गणेश जोगदंड यांच्यामध्ये असून याचा फायदा नवनियुक्त गटविकास अधिकारी राठोड यांना होणार आहे. नरेगा मधील विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी सहाय्यक कार्यक्रमाधिकारी जोगदंड यांची सतत तळमळ असते कार्यालयात कमी वेळ असले तरी फिल्डवर जास्त लक्ष देण्यावर त्यांचा भर असतो. गटविकास अधिकारी अशोक राठोड यांनी पदभार स्वीकारताच त्यांना पंचायत समितीच्या कारभारात सहकार्य करणारा उमदा

पान २ वर...

# शिवसंग्रामकडून निर्णयाचे स्वागत

**बैठक:** कार्यकर्ते म्हणाले आम्ही ज्योती मेटेंच्या पाठिशी

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षात पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष, आदरणीय खासदार शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या उपस्थितीत दी.२० ऑक्टोबर रोजी मुंबईत शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती विनायकराव मेटे यांनी प्रवेश केला याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष जयंतराव पाटील, राष्ट्रीय कार्याध्यक्ष, महासंसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे ,राज्याचे माजी उपमुख्यमंत्री व ज्येष्ठ नेते विजयसिंह मोहिते- पाटील, खासदार धैर्यशील मोहिते- पाटील, आ. शशिकांत शिंदे उपस्थित होते. या प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर आज बीड जिल्हा शिवसंग्रामच्या प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांची बैठक संपन्न झाली. या बैतकित सर्वानुमते शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योती मेटे यांच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले आणि संपूर्ण बीड जिल्हा शिवसंग्राम खंबीर पने डॉ. मेटे



यांच्या पाठीशी उभी राहिल असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. तसेच या प्रवेशाचे उपस्थित कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी देखील स्वागत केले.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडी वेग घेत असून काल आपल्या नेत्या डॉ. ज्योतीताई मेटे यांनी नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी - शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला आहे. आज त्याच अनुषंगाने बीड जिल्हा शिवसंग्राम कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांची बैठक या ठिकाणी बोलवण्यात आली आहे. या ठिकाणी उपस्थित सर्वांनीच ताईंच्या या निर्णयाचे स्वागत केले असून मी ठामपणे डॉ. ज्योतीताई मेटे यांना विश्वास देतो की बीड जिल्ह्यासह राज्याची शिवसंग्राम ठामपणे आपल्या पाठीशी उभी आहे. असे मत यावेळी शिवसंग्रामचे

पान २ वर...

# रिपाइं महायुती विरोधात काम करणार

**मायाताई मिसळे :** केजमध्ये डावलले

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

रिपाई जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या मागे बीड जिल्ह्यातील आंबेडकरी जनता खंबीरपणे उभी आहे यांना महायुतीकडून केज राखीव मतदारसंघात उमेदवारी देण्याचे संकेत दिले होते.२०१९ मध्ये देखील उमेदवारी देण्याचे निश्चित झाले होते,परंतु शेवटच्या क्षणात उमेदवारी नाकारल्याने आंबेडकरी जनता नाराज झाली होती.आता २०२४ ला देखील जाहीर आश्वासन देऊन पप्पू कागदे यांना उमेदवारी न दिल्याने आंबेडकरी जनता रोष व्यक्त करत असून महायुतीचां प्रचार करणार नाहीत, महायुतीच्या उमेदवारांना मतदान करणार नाहीत. आंबेडकरी जनतेतून प्रतिक्रिया येत आहेत.बीड मधील मेळाव्यात,सभेत यांनी मंत्री,नामदार रामदास आठवले यांनी बीड मधील



उमेदवारी जाहिर केली होती. केज मतदान संघात पप्पुजी कागदे साहेब यांना जाणीवपूर्वक महायुतीच्या लोकांनी डावलेले आहे, महायुतीला फक्त रिपाई चे मदत हवी आहेत का? मतदानापुरताच तुम्ही तरी समाजाचा वापर करून घेणार आहात का? आजच्या भीमसैनिकाला आठवली गटाच्या एका नेत्याला आमदार करायचं नाही का?असे महायुतीतील नेत्यांनी ठरवले

पान २ वर...

**पडघम** विजयासाठी कामाला लागावे

# धारुरमध्ये वंचितचा कार्यकर्ता मेळावा

दिंद्रूड/पुण्यभूमी प्रतिनिधी

वंचित बहुजन आघाडी माजलगाव मतदार संघाचे अधिकृत उमेदवार शेख मंजुर यांच्या उपस्थितीत कार्यकर्ता मेळावा धारूर शहरातील आर्या फंक्शन हॉल येथे संपन्न झाला.

दलित -मुस्लिम-आदिवासी-ओबीसी समूहामध्ये शेख मंजुर यांच्या उमेदवारीने अतिशय उत्साहाचा वातावरण तालुक्यामध्ये निर्माण झालेले आहेत. या बैठकीत प्रास्ताविकपर तालुकाध्यक्ष इंजि. प्रशांत उघडे यांनी बोलताना पक्षाने दिलेला उमेदवार शेख मंजुर असुन तो सर्व बाळासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्त्यांना मंजुर आहे. येणार्या विधानसभेच्या निवडणुकीत मोठ्या ताकदीने शेख मंजुर यांच्या पाठीमागे उभा करण्याचे आश्वासन दिले.



वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार शेख मंजुर यानी माजलगाव मध्ये नगर परिषदेचे नगराध्यक्ष असताना विविध कल्याणकारी योजना राबवून केलेल्या विकास कामांची माहिती दिली. येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने माजलगाव मतदार संघातील धारूर तालुक्यातील घाट रुंदीकरणाचा प्रश्न असेल धारूर शहरातील पाणीपुरवठ्याची योजना असेल प्रभावी राबवण्याचे धारूरकरांना आणि तालुक्यातील जनतेला आश्वासन दिले. येणाऱ्या काळामध्ये धारूर तालुक्यातील उद्योगधंद्यांचा प्रश्न असेल सुशिक्षित बेरोजगारांचा प्रश्न असेल विद्यार्थ्यांचा प्रश्न असेल अशा अनेक प्रश्नांना घेऊन आपण जर मला संधी दिली तर नक्कीच याची पूर्तता करण्याचे आश्वासन शेख मंजूर भाई यांनी बोलताना दिले. या बैठकीला वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष भारत तांगडे, सचिन उजगरे वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हाध्यक्ष अनिल भैय्या डोंगरे युवक जिल्हाध्यक्ष बाबुराव मस्के, माजलगाव तालुका अध्यक्ष संजय नाकलगावकर वडवणी तालुकाध्यक्ष अविनाश झोडगे समाधान गायकवाड, धम्मानंद साळवे धारूर तालुक्याचे

पान २ वर...

# नमितावर सगळेच खार खावून!

**चर्चा:** यंदा १०० टक्के नमिता घरी बसणार?

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी अंबाजोगाई येथील भाजपाच्या मोठ्या गटासह व भारतीय जनता पार्टीच्या १७ नगरसेवकांसह भेट घेतली असून, जवळजवळ आम्ही आलो नाही तरी चालेल पण नमिता मुंदडा, यांना आम्ही घरी बसवणारच असाच बैठकीत निर्णय झाल्याचे बोलले जात आहे. विधानसभेच्या संग्रामाला सुरुवात झाली असून तिकीट वाटप लवकरच दोन दिवसाच्या आत होणार असून तिकीट वाटप होण्याअगोदरच अंबाजोगाई व केज येथील मात्र नमिता अक्षय मुंदडा यांना घरी बसवण्यासाठी मुंडे समर्थक, विविध संघ, संघटना त्याचबरोबर भारतीय जनता





पार्टीचे आजी-माजी जवळजवळ १७ नगरसेवक हे संगीता ठोंबरे यांच्या निर्णायक बैठकीला बसत असून नमिता मुंदडा यांना कसे घरी बसवायचे याचे नियोजन मात्र प्रत्येक असेच चालू असून याच अनुषंगाने दोन दिवसांपूर्वी संगीता ठोंबरे यांच्या सोबत अंबाजोगाई च्या बड्या बड्या नगरसेवकांनी मराठा योद्धा मनोज दादा जरांगे यांची भेट घेतली असून ही भेट सकारात्मक मानली जात असून संगीता ठोंबरे समर्थक नाराज मुंडे समर्थक, नाराज मुस्लिम बांधव आणि नाराज मराठा बांधव

पान २ वर...